। धाराशिव । वर्ष २५ वे । अंक २२३ वा । रविवार दिनांक १६ नोव्हेंबर, २०२५ । पृष्ठे ६ । किंमत ०१ ₹

RNI MAHMAR/2003/11649

# लातूर समाचार

(सांज दैनिक)
प्रकाशन: धाराशिव (उस्मानाबाद आवृत्ती)
पोष्ट परवाना L2/RNP/OMD- 52/24-26

dainiklatursamachar@gmail.com
संस्थापक : स्व. शंकर माधव जडे (स्वातंत्र्य सैनिक)

## क्राईम न्युज

### पाण्याच्या मोटारीची चोरी

मुरुम(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे-हनुमंत रमेश औरादे, वय ५३ वर्षे, रा.कदेर ता. उमरगा जि.धाराशिव यांची अंदाजे १०,००० किंमतीची सिआरआय कंपनीचा ५ एच पी ११ पाण्याची मोटर ही दि.०९.११.२०२५ रोजी ००.०१ ते १०.०० वा. सु. मुरळी शेत शिवार गट नं ५६ मधून अज्ञात व्यक्तीने चोरुन नेली. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-हनुमंत औरादे यांनी दि.१४.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन मुरुम पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३०३(२), अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### ३००लिटर डिझेलची चोरी

धाराशिव (प्रतिनिधी)- शहर पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी छोटु मुन्ना खान, वय ४० वर्षे, रा. जैतपुर ता.बामोर जि. मुरेना यांचे कंटेनर क्र आर जे १४ जीएल ८०४४ चे डिझेल टाकीचे टोपन अज्ञात व्यक्तीने उघडून टाकीमधील ३००लिटर डिझेल २७,४२० किंमतीचे चोरुन नेले.अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-छोटु खान यांनी दि.१४.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन धाराशिव शहर पो ठाणे येथे भा.न्या.सं.कलम ३०३(२) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### सोन्याचे दागिणे व रोख रकमेची चोरी

नळदुर्ग(प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी सतिष विश्वनाथ दराडे, वय ४२ वर्षे, रा.हगलुर ता. तुळजापूर जि.धाराशिव यांचे राहते घराचे कुलूप अज्ञात व्यक्तीने दि. १३.११.२०२५ रोजी तोडून आत प्रवेश करुन कपाटातील २४१ ग्रॅम वजनाचे सोन्याचे दागिने व रोख रक्कम २,६५,००० असा एकुण ११,५६,४४३ किंमतीचा माल चोरुन नेला. अशा मजकुराच्या फिर्यादी नामे-सतिष दराडे यांनी दि.१४.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन नळदुर्ग पो ठाणे येथे भा.न्या. सं.कलम ३३१(४),३०५ अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

### कंपाउंडचे तारा तोडून पोल उखडून केले नुकसान

भुम (प्रतिनिधी)- पोलीस ठाणे अंतर्गत फिर्यादी नामे सुंदरराव भाउसाहेब हुंबे, वय ६९ वर्षे, रा. समर्थनगर भुम ता. भुम जि. धाराशिव यांचे लक्ष्मीनगर सर्वे नं २११ मधील सरस्वती गृह निर्माण संस्थेच्या प्लॉटींग मध्ये भुम येथे सुरेश रा. पारगाव ता. वाशी जि. धाराशिव, सचिन रा. भुम जेसीबी चालक व इतर पाच इसम यांनी दि. १२.११.२०२५ रोजी फिर्यादी यांचे जागेतील पुरावा नष्ट करण्याचे उद्देशाने अनाधिकृतपणे घुसून कंपाउंडचे तारा तोडून पोल उखडून काढून ७ ते८ पोल अंदाजे ५,५०० चोरुन नेले. अशा मजकुराच्या फिर्यादी सुंदरराव हुंबे यांनी दि.१४.११.२०२५रोजी दिलेल्या प्रथम खबरेवरुन भुम पो ठाणे येथे भा.न्या. स.कलम ३०३(१), ३२४(२),३२९(३), ३(५) अन्वये गुन्हा नोंदवला आहे.

# बेशिस्त चालकांवर कॅमेऱ्याची नजर

## चौथे ट्रॅफिक इंटरसेप्टर वाहन धाराशिवकरांच्या सेवेत




धाराशिव (प्रतिनिधी)- वाहतुकीला शिस्त लावण्यासाठी व अपघातावर नियंत्रण आणण्याकरिता जिल्हा वाहतूक शाखा आता इंटरसेप्टर वाहनांचा वापर करणार आहे. या वाहनाच्या माध्यमातून नियम मोडणाऱ्यांवर नियंत्रण ठेवण्याचे काम केले जाणार आहे. धाराशिवच्या वाहतूक शाखेत गुरुवारी नवीन वाहन दाखल झाले आहे.

जिल्ह्यात मागील काही वर्षापासून वाहनांची संख्या झपाट्याने वाढत आहे. वाहतुकीला शिस्त लागावी म्हणून वाहतूक शाखेत आधुनिक इंटरसेप्टर वाहनांचा समावेश करण्यात आला आहे. या वाहनामुळे नियमभंग, वेगमर्यादा उल्लंघन, तसेच धोकादायक वाहनचालकांवर कारवाई करणे आता शक्य होणार आहे. वाहनाच्या सहाय्याने सील्ट बेल्ट न वापरणे, मोबाइलवर बोलत वाहन चालविणे, काळ्या काचांचा कारला वापर करणे, हेल्मेट न वापरणे आदींवर नजर ठेवली जाणार आहे, असे वाहतूक शाखेने सांगितले. प्रकार - दंड ट्रिप्पल सीट प्रवास १००० हेल्मेट न वापरणे १००० वेग मर्यादा २००० रॅश ड्रायव्हिंग १००० ब्लॅक फिल्म बसवणे ५०० (दुसऱ्यांवेळी १५००) मोबाइलचा वापर १००० (दुसऱ्यांवेळी १००००) सील बेल्ट न लावणे ५०० (दुसऱ्यावेळी १५००) इंटरसेप्टर वाहन नियम मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यासाठी उपयुक्त ठरणार आहे. तसेच या वाहनांमुळे वाहनधारक वेग मर्यादांचे पालन करुन वाहने चालवतील. त्यामुळे अपघाताच्या घटनाही कमी होण्यास मदत होईल. राष्ट्रीय महामार्गावर जिल्ह्यात या वाहनाच्या माध्यमातून कारवाया केल्या जाणार आहेत. - अरविंद हिंगोले, सहायक पोलिस निरीक्षक, वाहतूक शाखा, धाराशिव

वाहनाच्या माध्यमातून कारवाया कशा करावयाच्या याबाबत तीन कर्मचाऱ्यांना पुणे येथे प्रशिक्षण मिळाले आहे. उर्वरित कर्मचाऱ्यांना लवकरच प्रशिक्षण दिले जाणार आहे. त्यामुळे या वाहनच्या माध्यमातून कारवायाही आता सुरु होणार आहेत.

# बिहारमध्ये विजय धाराशिवमध्ये जल्लोष



धाराशिव (प्रतिनिधी)- बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या ऐतिहासिक विजयाबद्दल भाजप पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दुपारी धाराशिवमधील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विजयी जल्लोष साजरा केला. महापुरुषांना अभिवादन करून मिठाई वाटून, फटाक्यांच्या आतषबाजीत सर्वांनी हा आनंद साजरा केला. या वेळी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकाऱ्यांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मार्गदर्शन केले. विजयाचा मोठा इव्हेंट करून शहरात वातावरण निर्मितीचा प्रयत्न झाला. मात्र, धाराशिव व बिहारची तुलना करू नका, असा टोला लगावला.

बिहारच्या नागरिकांचा भाजपवर असलेला दृढ विश्वास या निकालातून ठळकपणे अधोरेखित झाला आहे. धाराशिवची जनतादेखील महायुती व भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. येत्या पालिका निवडणुकीत त्याचा प्रत्यय येणार आहेच. मध्यंतरी पालिकेत सत्तेत असलेल्यांनी शहराचे अक्षरशः वाटोळे केले आहे. त्या सगळ्या अडचणींवर मात करून आपण सर्वांनी कामाला लागावे, असे आवाहनही आमदार राणा पाटील यांनी या वेळी केले.

या वेळी जिल्हाध्यक्ष दत्ताभाऊ कुलकर्णी, सुरेश देशमुख, नितीन काळे, नेताजी पाटील, अनिल काळे, अमित शिंदे, नितीन भोसले, सुनील काकडे, युवराज नळे उपस्थित होते.

यावेळी विरोधाकवर टीकास्त्र सोडले. ते म्हणाले, विकासाच्या केवळ गप्पा मारू नका. १४० कोटींच्या रस्त्याच्या कामाला स्थगिती, जिल्हा नियोजन समितीच्या निधीला स्थगितीचा मुद्दा उपस्थित करून त्यांनी टीका केली. यावेळी घोषणाही दिल्या. बिहारमध्ये विजयाचा आनंद धाराशिवात उमटला आहे.

# सतत खंडित विद्युत पुरवठ्याचा शेतकऱ्यांना होतो मनस्ताप

वाशी(प्रतिनिधी)-अतिवृष्टीने नुकसान झाले आहे. खरीप वाया गेले. मात्र आता रब्बीला मुबलक पाणी उपलब्ध असताना विजेच्या समस्येमुळे भविष्यात रब्बी पिके जगवताना अडचण येण्याची भीती आहे. तालुक्यातील विजेची समस्या गंभीर आहे. एखाद्या वेळी विद्युत पुरवठा खंडित झाला तर तो सुरळित होण्यासाठी अनेक दिवस वाट पाहावी लागते. लोड वाढल्याने सातत्याने बिघाड होत असल्याचे दिसते. विजेची समस्या दूर करावी, अशी अपेक्षा शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

वाशी तालुक्याला विद्युत पुरवठा करण्यासाठी यशवंडी, पारा, पारडी व वाशी हे चार उपकेंद्र आहेत. ज्याची क्षमता ही ३३/११ केव्ही आहे. ज्यांना भूम येथून डोंगर, जंगल अशा दुर्गम भागातून आणलेल्या विद्युत वाहिनीतून विद्युत पुरवठा होतो. तालुक्यात वाढलेला विजेचा वापर, मागील ४५ वर्षांपूर्वी उभारलेली विद्युत वाहिनी, कमी क्षमतेचे उपकेंद्रे यामुळे शेतीसाठी विजेचा जादा वापर आलेल्या रब्बी हंगामात म्हणजे हिवाळा, वादळी वारे आणि पाऊस असलेला पावसाळा आणि उन्हाळ्यात ही वादळी वाऱ्यात अतिभार यामुळे तांत्रिक बिघाड, खांब, कोसळणे, उपकेंद्रातील ट्रान्सफॉर्मर जळणे या गोष्टी सातत्याने घडत आहेत.

ज्याचा परिणाम हा वीज पुरवठ्यावर होऊन कधी २४ तास तर कधी ७२ तास खंडित वीजपुरवठा असतो. विजेची ही समस्या आज अथवा मागील दोन-चार वर्षात निर्माण झालेली नसून, मागील २० वर्षांपासून ही समस्या येथील नागरिक झेलत आहेत. मागील चार ते पाच दिवसांपूर्वी विजेचा वापर वाढल्याने अधिकचा भार वाढल्याने वाशी उपकेंद्रातील सिटी ट्रान्सफॉर्मर जळाला होता. हा बिघाड दुरुस्त करण्यासाठी चार दिवस लागल्याने सगळा भार दुसऱ्या ट्रान्सफॉर्मरवर जोडावा लागल्याने कमी दाब आणि बत्तीगुल प्रकार शेतकरी,व्यापारी नागरिक यांना सहन करावा लागला.

एकाच अधिकाऱ्यावर संपूर्ण तालुक्याचा भार शहरात असलेल्या उपविभागीय अभियंता यांची बदली होऊन एक वर्ष होत आले आहे. तर पारगाव शाखा कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांची बदली होऊन ६ महिने लोटले आहेत. तर वाशीच्या सहाय्यक अभियंता हे प्रशिक्षणासाठी गेलेले आहेत.यामुळे उपविभागीय कार्यालयात असलेल्या सहाय्यक अभियंता यांच्यावर ४ अधिकाऱ्यांचा कारभार पाहण्याचा भार आहे. नवीन डिमांड मंजुरी, बिघाड,वसुली, कार्यालयीन कामे ही एकट्याला करावे लागत आहेत.

# परंडा येथे शस्त्र कायद्यांतर्गत गुन्हा नोंद

धाराशिव (प्रतिनिधी)- परंडा पोलीस ठाणे अंतर्गत विशाल रा.माळी गल्ली परंडा ता. परंडा जि. धाराशिव, सागर बाळु माळी, वय ३० वर्षे, रा. भोत्रा रोड परंडा ता. परंडा जि. धाराशिव यांनी दि.१४.११.२०२५ रोजी डॉ. बाबासाहेब अंबेडकर चौक परंडा येथे लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल असे एक लोखंडी कोयता सह स्विफट डिझायर क्र एमएच १२ जेयु २७२० ही सार्वजनिक ठिकाणी वाहतुकीस अडथळा निर्माण होईल असे विनापरवाना बेकायदेशीर रित्या स्वत:चे जवळ बाळगलेला परंडा पोलीसांना मिळून आला. यावर पथकाने नमुद पिस्टल जप्त करुन फिर्यादी नामे-गजानन शंकर मुळे, नेमणुक परंडा पोलीस ठाणे यांनी दिलेल्या प्रथम खबरेवरुन शस्त्र कायदा कलम- ४,२५ सह भा.न्या. सं.कलम २८५, ३(५) सह कलम ११०/११७ मपोका अन्वये परंडा पो. ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

# धाराशिव येथे श्री दत्तगुरू महाराज यांच्या जन्मोत्सवनिमित्त अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन

धाराशिव: त्रैलोक्याचे स्वामी प.पू. श्री गुरूदेव दत्तात्रेय महाराज यांच्या जन्मोत्सवनिमित्त पिताश्री श्रीमंतराव (आबा) रणदिवे प्रतिष्ठानच्या वतीने गुरूचरित्र पारायण, भजन, कीर्तन, अखंड दत्तनाम सप्ताह सोहळयाचे आयोजन करण्यात आले आहे. धाराशिव शहरातील श्री सद्गुरू कॉलनी, भानूनगर येथे गुरूवार, दि. २७ नोव्हेंबर ते दि. ४ डिसेंबर या कालावधीत हा सप्ताह सोहळा संपन्न होणार आहे.

शहरातील श्री सद्गुरू कॉलनी येथे पिताश्री श्रीमंतराव (आबा) रणदिवे प्रतिष्ठाणच्या वतीने प्रतिवर्षाप्रमाणे यावर्षीही श्री गुरूदेव दत्तात्रेय महाराज यांच्या जन्मोत्सवनिमित्त अखंड दत्तनाम सप्ताह सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे. सप्ताहचे यंदा ११ वे वर्षे आहे. गुरूवार, दि. २७ नोव्हेंबर रोजी स. १० वा. महंत श्री तुकोजी बाबा (तुळजापूर) यांच्या हस्ते श्री गुरुदेव दत्तात्रेय महाराज, श्री तुळजाभवानी देवीजी, श्री जोतिबा देवांच्या पूजनाने सप्ताह सोहळ्यास प्रारंभ होणार आहे. सप्ताह सोहळ्यात स. १० ते दु. १२.३० गुरुचरित्र पारायण, दु. १ ते सायं. ६ भजनसेवा होणार आहे. गुरूवार दि. २७ नोव्हेंबर रोजी दु. १ वा. विठाई भजनी मंडळाची भजनसेवा, शुक्रवार, दि. २८ नोव्हेंबर रोजी दु. १ ते ४ गणगणात बोते मंडळ, दु. ४ ते ६ गजानन भजनी मंडळ, शनिवार दि. २९ नोव्हेंबर रोजी दु.१ वा. ज्ञानेश्वर माऊली भजनी मंडळ, रविवार दि. ३० नोव्हेंबर रोजी जिजाऊ भजनी मंडळ, सोमवार दि. १ डिसेंबर रोजी संत जनाबाई भजनी मंडळ, मंगळवार दि. २ डिसेंबर रोजी रुक्मिनी भजन (दु.१ ते ५) व मृदंगाचार्य तात्या टिंगरे व सहकारी भजनी मंडळ (साय. ७ ते १०), बुधवार दि. ३ डिसेंबर रोजी सखी भजनी मंडळ (दु.१ ते ४) व शोभन भजनी मंडळाची दु.४ ते ६ या वेळेत भजन सेवा होणार आहे. गुरूवार दि.४ डिसेंबर रोजी श्री दत्तगुरूंच्या पादुकांचा महाभिषेक, स. ८ वा. गुरूचरित्र ग्रंथदिंडी तर स. १० वा. भागवताचार्य हभप अमोल बोधले महाराज यांचे काला- गुलालाचे कीर्तन होणार आहे. दु. १२.३० वा. श्री दत्तगुरूंचा जन्मोत्सव सोहळा व यानंतर दु. १.३० वाजेपासून महाप्रसाद वाटप होऊन या सप्ताह सोहळ्याची सांगता होणार आहे.भाविक- भक्तांनी या भक्ती, आनंद व मंगलमय सोहळ्यामध्ये सहभागी व्हावे, असे आवाहन पिताश्री श्रीमंतराव (आबा) रणदिवे प्रतिष्ठानच्या वतीने अध्यक्ष धनंजय रणदिवे व सद्गुरु कॉलनीतील भाविक -भक्तांनी यांनी केले आहे.

# मॉर्निंग वॉकच्या गर्दीने सर्वच रस्ते फुलले

उमरगा(प्रतिनिधी)- गेल्या काही दिवसांपासून थंडीत वाढ झाली असून, उमरगा तालुक्यातील गुंजोटी- उमरगा राज्य मार्गावर मॉर्निंग वॉकसाठी नागरिकांची गर्दी वाढल्याचे चित्र आहे. शहरातील व ग्रामीण भागातील रस्ते पहाटे मॉर्निंग वॉकसाठी चांगलेच फुलल्याचे दिसत आहे. यात पोलिस भरतीसाठी तयारी करत असलेल्या युवकांचाही मोठा सहभाग आहे.

या धकाधकीच्या जीवनात मानवाला शरीराकडे लक्ष्य द्यायला वेळ नाही. यामुळेच नागरिकांना अनेक व्याधींना सामोरे जावे लागत आहे. सध्या मधुमेह आणि हृदयरोगाने अनेकजण त्रस्त आहेत. बैठ्या कामामुळे आजाराचे प्रमाण अधिक असते. यामुळे दिवसेंदिवस आजारी नागरिकांची संख्या वाढत आहे. कोलेस्ट्रॉल वाढीच्या आजारावर डॉक्टर व्यायाम करण्याचा सल्ला देतात. यामुळे सकाळच्या वेळी व्यायाम करणाऱ्यांची संख्या वाढली आहे. सध्या बहुतांश कामे ही यंत्राच्या साहाय्याने केली जात आहेत त्यामुळे शारीरिक हालचाली कमी झाल्या. शारीरिक श्रम कमी झाले. बैठ्या कामामुळे वजन वाढणे, शरीरातील साखरेचे प्रमाण वाढणे, हृदयरोग यासारख्या आजारांच्या रुग्णसंखेत वाढ झाली. विविध आजार बळावत गेले. या सर्व व्याधींवर सर्वोत्तम उपाय म्हणजे पहाटेचे फिरणे आणि व्यायाम समजला जातो. सध्या गुंजोटी-उमरगा रस्ता, गुंजोटी- भूसनी रस्ता, गुंजोटी-शिवपुरी रस्ता या मार्गावर मॉर्निंग वॉकसाठी महिला, पुरुष, तरुण वर्गाची संख्या वाढली आहे. गुंजोटी रस्त्यावरील द्वारका व आर. एस. प्लॉटिंग भागात व्यायामासाठी सुसज्ज जागा असल्याने येथे चांगलीच गर्दी वाढली आहे. येथे प्राणायाम, योगासने, ध्यानधारणा, व्यायाम करणाऱ्यांची संख्या वाढली आहे.

# वीजेची तार तुटल्याने दोन हेक्टर ऊस जळून खाक

धाराशिव (प्रतिनिधी)-धाराशिव तालुक्यातील काकासपूर येथील गोरोबा विठ्ठलराव पाटील यांच्या शेतावरून जाणाऱ्या ३३ केव्ही उच्च दाबाने चालणाऱ्या प्रवाहाची तार तुटल्यामुळे उभ्या असणाऱ्या दोन हेक्टर उसाला मोठी आग लागली आणि यामध्ये १३ लाख रुपयांचे नुकसान झाले आहे. दोन हेक्टर ऊस, एक लिंबाचे झाड, सात आंब्याची झाडे, १७ पाईप नग, ठिबक सिंचन संच, असे शेतीचे पीक आणि साहित्य या आगीमध्ये जळून खाक झाले. ते ३० किमी उच्च दाबाची तार तुटल्यामुळे ही तार उसामध्ये पडली आणि उसाने पेठ घेतला ही बाब महावितरण कंपनीच्या लक्षात आल्यानंतर त्यांनी लोहारा आणि तुळजापूर येथील अग्निशामकच्या गाड्या बोलावून ही आग आटोक्यात आणली आजूबाजूच्या शेतकऱ्यांना देखील याची झळ पोचली आहे.

# धरित्री विद्यालय आलियाबाद येथे पंडित जवाहरलाल नेहरू यांना अभिवादन



नळदुर्ग(विजय पिसे)- धरित्री विद्यालय आलियाबाद नळदुर्ग येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून साजरी करण्यात आली यावेळी प्रशालेचे मुख्याध्यापक श्री चव्हाण आर बी,शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते. इयत्ता दहावी मधील कुमारी ज्ञानेश्वरी सुनील पवार राज्यस्तरीय चित्रकला स्पर्धेमध्ये प्रथम क्रमांक मिळवल्याबद्दल त्याचे प्रशालेच्या वतीने मुख्याध्यापक यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला तसेच विद्यार्थ्यांची भाषण स्पर्धा घेण्यात आल्या याप्रसंगी प्रशालाचे मुख्याध्यापक यांनी स्वतंत्र भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या जीवनातील काही प्रसंगाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

ओ३म् भूर्भुवः स्वः ।
तत्सवितुर्वरेण्यं भर्गो देवस्य धीमहि ।
धियो यो नः प्रचोदयात् ।।

# लातूर समाचार

## बिहार निकाल विचार करायला लावणारा

बिहारचा निकाला कोणाच्या बाजूने लागेल हे सांगता येत नव्हते. वास्तविक दरवेळी अंदाज बांधणे कठिण होते असा बिहार प्रांत आहे. असे असताना यावेळी काँग्रेसचे सर्वेसार्वा राहुल गांधी या बिहार प्रांताकडे विशेष लक्ष दिले होते. वारंवार विविध उपक्रम राबवुन जनजागृती केली होती. राहुल गांधी थेट भाजपा पेक्षा नरेंद्र मोदी यांच्यावर टिका केली होती. चोर आहे नंतर मतचोर असे विविध अपशब्द वापरून टिका केली होती. कधी मतदान मशिनमध्ये गडबड आहे अशी शंका व्यक्त करून बदनाम करण्याचा मोठा प्रयत्न केला. पंतप्रधान मोदी यांचे विविध कार्यक्रम झाले. त्यांनी वैयक्तिक टिका टाळून बिहाराच्या विकासासाठी मत व्यक्त केले. व्यवहार ज्यांना कळला त्यांना अनेक बाबी यशस्वी होतो. महाराष्ट्र लाडकी बहिणींनी साथ दिली तशीच साथ बिहारच्या महिलांनी दिली. विशेष करून मुस्लीम महिलांनी सुद्धा भाजपाला साथ दिली असे विचार समोर येतात. महाराष्ट्रात भाजना एक नंबर यासाठीच बनला. त्यामुळे ज्यांना राजकारण यशस्वी खेळता येते तेच राजकारणात यशस्वी होतात. पहिल्यांदा भाजपाने मध्यप्रदेशात यशस्वी झाल्यानंतर हाच प्रयोग महाराष्ट्रात नंतर आता बिहारमध्ये तो यशस्वी झाला आहे. हे मान्यच केले पाहिजे. अशा प्रकारास काय म्हणावे? कारण पुर्वी अमिषाला बळी पडू नका से सांगत असत. निर्भयपने मतदान करा. मतदान पवित्र कर्तव्य आहे असे सांगत होते. आता केवळ फरक दिसून येत आहे. पुर्वी काही प्रकार लपून होते आता उघड दिसून येत आहेत. मार्ग केवळ बदलला आहे. यावर चिंतन होणे अपेक्षित आहे. मध्यप्रदेश, महाराष्ट्र व आता बिहारमध्ये जो प्रकार दिसून आला यावर शरद पवार यांनी भाष्य केले आहे. अशा बाबीला आळा कसा घालणार? ही एक मोठी आवघड ठिकाणाचे दुखणे आहे. त्यामुळे चिंताजनकबाब असली तरी या बाबत सर्व पक्षाची एक जबाबदारी आहे की यातून मार्ग काढणे. गैर प्रकाराला अधिकृत साच्यात बसविण्याची कला दिसून येत असेल तर त्याला काय म्हणावे! त्यामुळे पहिल्यांदा विश्वास निर्माण करणे आवश्यक आहे. काँग्रेस पक्षाने केवळ टिका केली. सध्याला निवडणुक प्रक्रियेस शंका घेतली जात नाही. गुप्त मतदान पद्धत आज पर्यंत चालत आले. लोकशाहीत मतदानास महत्व दिलेले असते. त्यामुळे निवडणुक प्रक्रियेत लोकशाहीत जाहिर संशय घेणे म्हणजे आपलीच चुक आपण केल्या सारखे तेही मान्य केल्यासारखे आहे. भारतात लोकशाही मजबुत आहे. संविधानुसार देश चालतो, त्यामुळे जनतेला पटेल असेच बोलले पाहिजे. देशात नरेंद्र मोदी यांनी देशाची सुत्रे हाती घेतली तर दुसरे कडे काँग्रेसचे सर्व सुत्र राहुल गांधी यांनी घेतले. भाजपाने एक-एक काँग्रेसचे राज्य भाजपामय झाले. सुरवातीस काँग्रेसमुक्त भारत अशी घोषणा केली ती प्रत्यक्षात साध्य झाली नाही. काँग्रेस हा देश स्वातंत्र्यापुर्वीचा पक्ष आहे. याला दिशा योग्य मिळत नसल्याने अपयश येत आहे. देशात काँग्रेसची पुर्ण सत्ता होती. डाव्यांचे वर्चस्व काही राज्यात होते. बाकी काँग्रेसमय देश असताना आज काँग्रेसची स्थिती काय झाली आहे याचे आवलोकन काँग्रेस पक्षाने केले पाहिजे. मुळात आपल्या देशात लोकशाही आहे. ती मान्य केली पाहिजे. त्यावर घाला घालणे योग्य नाही. काँग्रेसने अनेक वर्षापासून जी भाषणे केली ती अधिक तर मोदी यांच्यावर टिका करणारी आहेत. मोदी यांचा परिवार सत्तेत किंवा राजकारणात नाही. घरातील मंडळी राजकारणात आणली नाही. इतर पक्षात काय दिसून येते. काँग्रेस पक्षात गांधी घराण्याचे वर्चस्व आहे. इंदिरा गांधी राजीव गांधी नंतर सोनिया ह्या राष्ट्रीय अध्यक्ष बनल्या, राहुल गांधी नंतर प्रियंका अशी साखळी अनेकांना आवडत नाही. हे पक्षात कोणी उघड बोलत नाही. जनतेला विकास हवा आहे. काँग्रेसच्या हाती सत्ता नाही व भाजपाच्या हाती सत्ता असल्याने ते काही ही करू शकतात, हे मान्यच केले पाहिजे. बिहारमध्ये अनेक वेळा वेगवेगळा प्रचाराचा मार्ग आवलंबला, जनतेसाठी काय केले. काँग्रेसची केद्रात सत्ता असताना अनेक घोटाळे उघडे पडले. ठराविकांचा लाड करीत असल्याचे उघडे पडले. जनता बोलत नाही मात्र जे करायाचे ते करीत असते. लाडक्या बहिणींनी साथ दिली. तसेच विरोधकांनी हा विषय छेडला. सत्ताधाऱ्यांनी बोलून गप्प असले कारण त्यांच्या हाती कांहीच नव्हते. सत्ताधाऱ्यांनी घोषणेची अमलबजावणी केली त्यामुळे जनतेचा विश्वास बसला हे मान्य केले पाहिजे. काँग्रेसने गरीबी हाटविण्याची घोषणा केली. केवळ घोषणाच दिसून आली. त्यामुळे जनतेला विश्वास हवा आहे. जे बोलतात ते करतात असा विश्वास निर्माण केला पाहिजे. याला वेळ लागतो. एका दिवसात किंवा एका वर्षात विश्वास बसत नाही. भाजपाने विश्वास बसेल असेच काम केले. सर्वात महत्वाचे म्हणजे भ्रष्टाचारास केंद्रातून आळा घातला गेला. याला काही प्रमाणात यश आले. लाडक्या बहिणीबरोबर, शेतकऱ्यांना पंतप्रधान किसान योजनाचा लाभ मिळवुन दिला. आज काँग्रेस ठोस अशी योजना का राबवित नाही. काँग्रेसने मोठ्या प्रमाणात चांगली माणसे शोधून त्यांच्या हाती सुत्रे दिली पाहिजेत. काँग्रेसच्या सानिध्यात मोठी झालेली मंडळी दूर गेली आहे. काँग्रेसला यापुर्वी ही काही राज्यात अपयश आल्यावर विचारपुर्वक पावले टाकणे आवश्यक होते. भाजपाला दक्षिणेत मोठे राज्य हवे होते. आगामी काळात तामिळनाडूत विधानसभेच्या निवडणुका होणार आहेत. प.बंगालमध्ये विधासभेची निवडणुक होणार आहेत. या दोन राज्यात विरोधीगटाची सत्ता आहे. येथे भाजपाचे काही चालेले मात्र काँग्रेसला यश मिळणार नाही. प. बंगालमध्ये ममता बॅनर्जी ह्या एकमेव सत्तेला चिटकून आहेत. येथे काँग्रेसला वाव मिळणार नाही. भाजपाला काही जागा मिळविता येईल. ममता बॅनर्जी यांना इंडिया आघाडीचे सुत्रे देत असताना त्यांनी स्विकारले नाही. विरोधकांची आजच्यास्थितीत इंडिया आघाडीचे असित्व कोठे आहे? त्यामुळे बिहार निकालावरून काँग्रेसला पुन्हा उभारी घेणे कठिण काम आहे. राष्ट्रीय अध्यक्ष मल्लिकार्जुन खरगे यांना भाषेची मोठी आडचण भासते. जसे योगी कोणत्याही राज्यात गेल्यास भाषणात बाजी मारतात. असे राहुल गांधी सोडले तर कोणीही काँग्रेस प्रचारक प्रभाव टाकणारा नाही. राहुल गांधी यांच्यात तळमळ असली तरी प्रत्यक्षात त्यांच्या पदररात यश किती मिळते याचा विचार केला पाहिजे. काँगेसला आता यापुढील दक्षिणेकडील राज्यात यश मिळविणे कठिण काम आहे. बिहारमधील निकालानंतर पुन्हा काँग्रेस मोठ्या प्रमाणात उभारी घेईल असे वाटत नाही. काँग्रेसकडे मोठी असा क्रांतीकारक घटना घडविण्याची योजनाच दिसून येत नाही. त्यामुळे भाजपाला कितीही आता रोखण्याचा प्रयत्न करणे योग्य ठरणारे नाही. भाजपापेक्षा अधिक चांगले काम करून दाखविणे त्यापेक्षा जनतेसोबतचे संबंध अधिकाधिक दृढ केल्याशिवाय आता दुसरा पर्याय दिसून येत नाही.

# लातूरचा मांजरा पॅटर्न

## सहकार आणि साखर उद्योगातून ग्रामविकासाचा महामार्ग






एक काळ होता, जेव्हा लातूरच्या ग्रामीण जीवनात सकाळ-संध्याकाळ प्रत्येक घरात शेतकऱ्याची कहाणी घुमत असे. ती कहाणी फक्त शेतीची नव्हती, तर ती होती सर्वांनी पाहिलेल्या एका स्वप्नाची. ज्यामध्ये शेतकरी केवळ कष्टकरीच नव्हे, तर आपल्याच मालकीच्या कारखान्याचा मालक बनला होता. एका उसाच्या कांडीपासून सुरू झालेला सहकाराचा प्रवास आज लातूरच्या विकासाचा दीपस्तंभ झाला आहे. लातूर जिल्ह्याच्या मातीत रुजलेली सहकाराची नीती आणि मांजरा साखर कारखाना परिवाराचा उदय हा केवळ एक औद्योगिक चमत्कार नसून, कोरडवाहू मराठवाड्याच्या ग्रामविकासाचा एक प्रेरणादायी प्रवास आहे.

लोकनेते विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टी आणि माजी मंत्री सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी पेरलेल्या बीजातून सहकारातून समृद्धीचा एक भव्य वटवृक्ष उभा राहिला, ज्यामुळे लातूर जिल्ह्याच्या अर्थकारणाचा आणि समाजकारणाचा कायापालट झाला. माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील म्हणत की, ''सहकार ही केवळ एक चळवळ नाही, तर ती दुर्बलांना बलवान बनवून समाजात परिवर्तन घडवून आणण्याचा एक मार्ग आहे.'' जणू ही उक्ती मांजरा परिवाराच्या रूपाने सार्थकच झाली आहे.

स्वातंत्र्यानंतर ग्रामीण अर्थव्यवस्थेच्या पुनर्बांधणीसाठी महात्मा गांधींच्या ग्रामस्वराज्य आणि आत्मनिर्भर ग्राम या विचारांतून सहकाराची संकल्पना पुढे आली. महाराष्ट्रात, विशेषतः लातूर जिल्ह्यात या चळवळीची बीजे पेरली गेली, जेव्हा शेतकऱ्यांच्या एकीकरणातून एक मोठी सहकारी संघटना उभी राहिली.

महाराष्ट्राच्या ग्रामीण जीवनात सहकार ही केवळ एक संकल्पना नसून, ती शेतकऱ्यांच्या आशा-आकांक्षांचा आणि सामाजिक-आर्थिक परिवर्तनाचा पाया आहे. माजी मुख्यमंत्री यशवंतराव चव्हाण, माजी मुख्यमंत्री वसंतदादा पाटील, माजी मुख्यमंत्री शरदचंद्र पवार आणि माजी मुख्यमंत्री विलासराव देशमुख यांच्या दूरदृष्टीमुळे महाराष्ट्रात सहकारी साखर कारखान्यांची एक मोठी चळवळ उभी राहिली.

मागासलेल्या मराठवाड्यात मांजरा साखर कारखान्याच्या स्थापनेचा इतिहास हा याच दूरदृष्टीचा अविभाज्य भाग आहे. सन १९९० च्या दशकात, मराठवाड्यासारख्या अवर्षणप्रवण भागात साखर कारखाना उभा करणे हे धाडसाचे काम होते. 'विकासरत्न विलासराव देशमुख मांजरा शेतकरी सहकारी साखर कारखान्या'चे उद्घाटन आधुनिक भारताचे शिल्पकार भारतरत्न राजीवजी गांधी यांच्या हस्ते झाले, ही घटना सहकाराच्या राष्ट्रीय स्तरावरील महत्त्वाचे प्रतीक आहे. आदरणीय विलासराव देशमुख साहेबांनी कारखान्याला त्यांचे 'जीव की प्राण' मानले, तर सहकारमहर्षी दिलीपराव देशमुख यांनी नियोजनबद्ध आणि पारदर्शक नेतृत्वाने या संस्थेचे संगोपन केले, ज्यामुळे हा कारखाना यशाच्या शिखरावर पोहोचला.

सहकारातून समृद्धी हा मांजरा परिवाराचा मूलमंत्र ठरला. मांजरा साखर कारखान्याचा आदर्श घेऊन माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी विलास कारखाना उभारला. कारखान्याच्या चेअरमन वैशालीताई देशमुख आहेत आज हा कारखाना आधुनिक साखर उद्योगासाठी पथदर्शी ठरला आहे. यानंतर लातूर जिल्ह्यासह परिसरातील जिल्ह्यांची गरज ओळखून ट्वेन्टिवन शुगर्स लिमिटेडची उभारणी करण्यात आली आहे. या साखर उद्योगाने ग्रामीण भागातील आर्थिक प्रवाह पूर्णपणे बदलला आहे. शेतकरी उद्योगाचा मालक झाला, सहकार मॉडेलमुळे शेतकरी केवळ ऊस उत्पादक न राहता, कारखान्याचा 'भागीदार' (मालक) बनला. यामुळे त्यांच्यात मालकी हक्काची भावना वाढली आणि कारखान्याच्या नफ्यात वाटा मिळू लागला. मांजरा परिवाराने सातत्याने एफआरपी () पेक्षा अधिक उच्चांकी भाव देऊन शेतकऱ्यांचे आर्थिक सक्षमीकरण केले.

स्थानिक रोजगाराच्या संधी: साखर कारखान्यासोबत अनेक उप-उद्योग उभे राहिले, ज्यामुळे लातूर जिल्ह्याचा कायापालट झाला. इथेनॉल, कोजनरेशन आणि अन्य कृषी-आधारित उद्योगांमुळे हजारो युवकांना गावातच रोजगार मिळाला.

या सहकारातून महात्मा गांधींचे ग्रामविकासाचे स्वप्न खऱ्या अर्थाने साकार झाले. कारखान्यांनी केवळ आर्थिक व्यवहार केले नाहीत, तर सामाजिक एकात्मतेचा धागा विणला. आर्थिक उलाढाल वाढली, पायाभूत सुविधांचा विकास झाला, साखर कारखान्याभोवती शिक्षणसंस्था, आरोग्य केंद्रे, रस्ते आणि पाणीपुरवठा योजना विकसित झाल्या.

सहकारातून सर्वसमावेशक विकासाची वाटचाल झाली, यामध्ये स्त्री-पुरुष, शेतकरी-कामगार यांचा समतोल विकास साधला गेला. महिला बचतगटांना कारखान्याच्या उपक्रमांशी जोडून महिला सक्षमीकरण साधले. या महिला सक्षमीकरण योजनेतून महिला बचत गटांना गृहउद्योग आणि दुग्ध व्यवसायासाठी प्रोत्साहन मिळाले.

नेतृत्व करण्याची संधी तळागाळातील लोकांना मिळाली, ग्रामीण भागातील नेतृत्वाला सहकारातून मिळालेली ही सुवर्णसंधी ठरली. माजी आमदार धीरज विलासराव देशमुख यांच्या माध्यमातून लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेने शेतकऱ्यांना ₹ १७०० कोटींचे पीक कर्ज दिले, तसेच स्पर्धा परीक्षा मार्गदर्शन केंद्रातून ४ हजारहून अधिक विद्यार्थ्यांना घडवले, जे नेतृत्वाच्या विकासाचे उत्तम उदाहरण आहे.

काळाची पाऊले ओळखून साखर उद्योगात ऊसशेतीचे यांत्रिकीकरण हा मांजरा परिवाराचा सर्वात यशस्वी आणि दूरदृष्टीचा प्रयोग ठरला आहे. १००% यांत्रिकीकरण करून मांजरा साखर कारखान्याने ऊस तोडणीसाठी यांत्रिकीकरणाचा धाडसी प्रयोग यशस्वी केला. विलास सहकारी साखर कारखान्यानेही ६० ते ७० टक्के यांत्रिकीकरण केले. ट्रेंचर (लागवड यंत्र), हार्वेस्टर (तोडणी यंत्र) आणि ड्रिप सिंचन यांसारख्या आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर वाढला. या यांत्रिकीकरणातून स्थानिक शेतकरी व शेतमजुरांच्या मुलांसाठी उद्योगातून रोजगार निर्मिती झाली. हार्वेस्टर ऑपरेटरला ₹ ५० हजार आणि ट्रॅक्टर ड्रायव्हरला ₹ २५ हजार पर्यंत पगार मिळतो, ज्यामुळे ग्रामीण युवकांना प्रतिष्ठा आणि स्थैर्य मिळाले आहे.

मांजरा परिवाराचा विकास पर्यावरणपूरक आणि शाश्वत आहे. यामुळे या भागात ऊस कल्पवृक्ष ठरला असून, विविधीकरण करून आणि हरित ऊर्जा माध्यमातून साखर उत्पादनासोबतच इथेनॉल, सहवीज (कोजनरेशन), बायोगॅससह बायो-प्लॅस्टिक यांसारख्या उप-उत्पादनांवर भर देण्यात येत आहे. भविष्यात ज्वारी, मका आणि इतर धान्यांपासून इथेनॉल निर्मिती करण्याचे नियोजन आहे. यामुळे कोरडवाहू पिकांनाही चांगला दर मिळेल आणि कारखाने बारमाही चालून रोजगार वाढेल.

मांजरा साखर परिवाराने लातूर जिल्ह्याच्या मातीत विकासाची आणि सामाजिक सलोख्याची संस्कृती रुजवली. पारदर्शक व्यवस्थापन, आधुनिक तंत्रज्ञान आणि सामाजिक बांधिलकी यांचा त्रिवेणी संगम साधत मांजरा परिवाराने लातूर जिल्ह्याच्या समृद्धीचा आणि ग्रामीण आत्मनिर्भरतेचा मांजरा पॅटर्न देशासमोर ठेवला आहे. गाव, शेतकरी आणि उद्योग हे तीनही हात एकत्र येऊन गोड साखरच नाही, तर गोड जीवनही तयार करतात, आणि हाच आहे लातूरच्या सहकाराचा खरा गोडवा.



राहुल हरिभाऊ इंगळे पाटील
मोबाईल - ९८९०५७७१२८

## पीठ मळून झाल्यानंतर त्यावर तीन बोटांचा ठसा का काढतात तुम्ही तर करत नाही ना 'ही' चूक




आज घरात नवरा बायको एकमेकांना घरकामात मदत करतात. दोघेही संसाराचा गाडा एकत्र पुढे नेतात. घरातील कामाचा एक भाग असतो तो म्हणजे स्वयंपाक करणे. स्वयंपाक म्हटलं तर वरण भात, भाजीसोबत गरमा गरम चपाती किंवा रोटी केली जाते. चपाती किंवा रोटी करायची म्हटलं तर आधी पीठ मळलं जातं. पीठ मळून झाल्यानंतर खास करुन महिला त्यावर तीन बोटांचा ठसा काढतात. अगदी घरातील पुरुषाने कधी पीठ मळून दिल्यानंतरही त्या त्यांना आवर्जून त्यावर बोटांचे ठसे देण्यास सांगतात. तुम्ही ही गोष्ट अनेक वेळा पाहिली असेल. पण त्यामागील कारणाबद्दल कधी विचार केला का प्रत्येक गोष्टीमागे कारण असतं. मग ते शास्त्रीय असो किंवा धार्मिक असो. पीठ मळून झाल्यानंतर बोटाच्या खुणा का दिल्या जातात या मागे काय कारण आहे याबद्दल आज आपण जाणून घेणार आहोत.

पूर्वजांशी आहे त्याचा संबंध!

पिठावर बोटांचे ठसं देण्यामागे धार्मिक कारण असून त्याचा संबंध हा पिंडदानाशी जोडला गेला आहे. हिंदू धर्मात पूर्वजांच्या आत्म्याच्या शांतीसाठी पिंड दान करण्याचा विधी केला जातो. पिंडदान केल्याने पितरांना स्वर्गप्राप्ती मिळते, धर्मशास्त्रात मान्यता आहे. पिठ किंवा तांदळापासून बनवलेले पिंडाचा संबंध हा चंद्रांशी आहे, धर्मशास्त्रात सांगण्यात आले आहे. अशीही मान्यता आहे की, चंद्राद्वारे पिंड हे पितरांपर्यत पोहोचतात. त्यामुळे पिंडदानाच्या विधी वेळी खासकरुन तांदळ पिठापासून किंवा भातापासून पिंड तयार केले जातात.

...म्हणूनच आपण बोटांचे ठसे देतो

धार्मिकशास्त्रात पिठाचे गोळे हे पूर्वजांचं अन्न मानलं जातं. त्यामुळे जेव्हा आपण घरात चपाती किंवा रोटी खातो तेव्हा आपल्याला पाप लागतं अशी समज आहे. हे पाप टाळण्यासाठी पीठ मळून झाल्यानंतर त्यावर बोटांचे ठसे दिले जाते. यानंतर या पिठापासून तयार केलेली चपाती किंवा रोटी खाण्यायोग असते असं म्हणतात. म्हणून घरोघरी जेव्हा पीठापासून खास करुन तांदळाच्या पिठापासून जितके पदार्थ असतात त्यांचं पीठ मळताना त्यावर बोटाचे ठसे दिले जातात. म्हणजे ते पिंडदानाचे पीठ वाटणार नाही आणि तुम्हाला पाप लागणार नाही.

## घरगुती सोप्या उपचारांनी अंगदुखीला करा बायबाय

दिवसभराच्या ताणतणावपूर्ण कामांमुळे अनेकांना अंगदुखी वा शरीराच्या कांही भागात वेदना होण्याचा त्रास होतो. अशा वेदनांमुळे आरोग्याच्या समस्याही निर्माण होऊ शकतात. त्यामुळे त्यावर वेळीच उपचार करणे गरजेचे असते. वेदनाशामक औषधे वारंवार घेण्याचे दुष्परिणाम होतात. त्यामुळे अंगदुखीवर वेदनाशामक औषधांचा वापर करण्याऐवजी आयुर्वेदात सांगितलेले काही घरगुती उपाय खूपच परिणामकारक ठरतात. कोणते आहेत हे उपाय त्याची ही माहिती शरीरात कुठेही वेदना होत असतील तरी लवंग व काळी मिरी यांचा चांगला उपयोग होतो. चहा करताना त्यात पाच लवंगा व थोडी मिरी घालून व आले घालून केलेला चहा गरमगरम प्यायलाने खूप आराम वाटतो. तसेच घसा दुखत असेल अथवा अंग दुखत असेल तर अर्धा चमचा हळद १ ग्लासभर दुधातून गरम असताना प्यायलानेही खूप फायदा होतो. दोन चमचे मोहरीचे तेल त्यात लसणाच्या पाच पाकळ्या टाकून गरम करावे व या तेलाचा मसाज तेल गरम असताना कापडाच्या बोळ्यावर घेऊन जेथे दुखते त्या जागी केल्यानेही वेदना कमी होतात. आल्याचे साल काढून ते गरम करावे व कॉटनच्या कापडात बांधून जेथे वेदना होत असतील तेथे त्याचा १० मिनिटे शेक घ्यावा.दालचिनी व मध १-१ चमचा कोमट पाण्यात घालून त्याचा मसाज दुर्खया भागावर केल्यानेही आराम मिळतो. तसेच निलगिरी व आल्याची पेस्ट कॉटन कपड्यात बांधून त्याचा शशे घेतल्यासही बरे वाटते. गरम पाण्यात मीठ घालून टॉवेल भिजवून शेक घेणेही खूपच फायद्याचे ठरते. या उपचाराने अंगावर कोठे सूज आली असेल तर तीही कमी होते. विशेषत: पाय दुखत असतील तर हा उपचार खूपच सोपा व परिणामकारक ठरतो.

## लिपस्टीक कशी निवडाल व कशी वापराल

आजकाल बहुतेक सर्या महिला लिपस्टीकचा वापर करतात. लिपस्टीक ही नुसते ओठांचे व चेर्हयाचे सौंदर्य वाढविते असे नाही तर ती आपला आत्मविश्वासही वाढवित असते. त्यामुळे ती कशी वापरावी याची माहिती असणे गरजेचे आहे.

आजकाल मार्केटमध्ये लिपस्टीकच्या हजारो शेडस मिळतात. मात्र त्यातल्या कोणत्या शेड आपल्या त्वचेला सूट करतात हे ओळखता यायला हवे. त्यासाठी आपल स्कीन टोन जाणून घ्यावा लागतो. तो जाणण्याचा मार्ग अगदी सोपा आहे. आपल्या म नगटाजवळ रक्तवाहिन्या किंवा नसा दिसतात. या नसांचा रंग निळा असेल तर आपला स्कीन टोन कूल आहे, हाच रंग हिरवा असेल तर आपला स्कीन टोन वॉर्म आहे व या ठिकाणी निळ्या व हिरव्या दोन्ही रंगांच्या नसा असतील तर आपला टोन न्यूट्रल आहे हे ओळखावे. कूल टोनला रेड, ऑरेंज व पेस्टल कलर्सच्या लिपस्टीक विशेष शोभतात. वॉर्म टोनला रेड, पिवळसर शेड असलेला ऑरेंज व पिंक कलरशेड चांगल्या दिसतात. न्यूट्रल टोनवाले जास्त भाग्यशाली असतात कारण त्यांना कुठल्याही शेडस चांगल्याच दिसतात. त्यातही पर्पल व वाईन कलरच्या शेडस त्यांच्यावर अधिक खुलतात.

लिपस्टीक नुसती लावून चालत नाही तर ती ओठावर दीर्घकाळ टिकायलाही हवी. त्यासाठी लिपस्टीक अगोदर ओठांना लिपबाम लावून घ्यावे. टूथब्रशच्या मदतीने ओठांवरची डेड स्कीन हळूवार स्वच्छ करावी. आता आपले ओठ अधिक स्मूथ झालेत हे लक्षात येते. त्यानंतर पुन्हा एकदा कंसीलर किंवा पावडरचा अगदी पातळ थर लावावा, तो ब्रशच्या सहाय्याने एकसारखा पसरवावा व नंतर ओठांच्या कडांनी लिपलायनर लावून त्यात लिपस्टीक फिल करावी. यामुळे ओठ जास्त उठावदार व आकर्षक दिसतात.


## आपले आरोग्य चांगले कसे राखाल..

आपल्या आरोग्याच्या बाबतीत काही ठराविक नियमांचे पालन कधीही फायद्याचेच ठरते. उदाहरणार्थ आहार आणि व्यायामातील नियामितपणा, तसेच झोपेच्या किंवा कामाच्या नियमित सवयी ह्या सर्वच गोष्टींनी आपले शारीरिक आणि मानसिक आरोग्य चांगले राहण्यास मदत होते. पण ह्यामधील काही सवयींचा जर अतिरेक झाला तर तो मात्र आपल्याला नुकसानकारक ठरू शकतो. उदाहरणार्थ वजन कमी करण्यासाठी जर डायट पाळायचे झाले तर डायट प्रमाणे आपले खानपान सांभाळणे चांगले. पण वजन जलद घटविण्याच्या मोहापायी डायटिंग चा अतिरेक करून शरीराला आवश्यक तेवढे अन्न ही न मिळू देणे हे मात्र हानिकारक ठरू शकते. ह्या अतिरेकाच्या परिणामस्वरूप शरीरामध्ये अशक्तपणा तर येईलच, पण उतरविलेले वजन फार काळापर्यंत लांब राहू शकणार नाही. जेव्हा आहार पूर्ववत होईल तेव्हा वजनही वाढायला लागेल. त्यामुळे आपले आरोग्य सांभाळायच्या दृष्टीने काही गोष्टींचा अतिरेक टाळायला हवा.

काही व्यक्ती आपल्या वजनाची सतत काळजी करत असतात. वजन घटविण्यासाठी किंवा वाढविण्यासाठी मनामध्ये एक ठराविक लक्ष्य असणे ठीक आहे पण त्याकरिता दररोज वजन काट्यावर उभे राहून वजनाची चिंता करत बसणे मात्र वाईट. आपण आपल्या आहाराची काळजी घेतली आणि सोबत नियमित व्यायामाची जोड मिळाली तर आपल्या मनातील लक्ष्य नक्कीच पूर्ण होईल. मात्र त्यासाठी वेळेचा निर्बन्ध मात्र घालू नये.

सर्वच व्यायामप्रकार सर्वच व्यक्तींना आवडतील किंवा करायला जमतील असे नाही. आपल्या मित्र – मैत्रिणी कुठला तरी ठराविक व्यायाम करतात म्हणून आपणही तेच करायला हवे असे नाही. काहींना चालणे आवडते, काहींना पळणे, काहींना सायकलिंग तर काहींना पोहोणे आवडते. आपल्याला जो व्यायामप्रकार आवडत असेल, ज्या मुळे आपल्याला शारीरिक स्वास्थ्याबरोबरच आनंदही मिळत असेल असा व्यायामप्रकार निवडावा. अश्या प्रकारे हा व्यायाम आपोआपच नियमित केला जाईल, आणि त्या मुळे आरोग्यही चांगले राहील. त्याचबरोबर आपल्या शरीराची ठेवण आपल्याला आवडत नाही म्हणून व्यायाम करायचा ही भावना मनात असू नये. व्यायामामुळे शरीर सुडौल होण्यास मदत मिळेलच, शिवाय, व्यायामामुळे आपल्याला आनंद मिळाला पाहिजे, त्यामुळे आपल्या एनर्जी लेव्हल्स चांगल्या राहिल्या पाहिजेत हे ओळखून व्यायाम करायला हवा.व्यायामच्या जोडीने सांभाळायचा असतो तो म्हणजे आपला आहार. आपण खाणार असलेले अन्न आपल्या आवडीचे असेल तर त्यातून आपल्याला आनंद मिळतो. अन्न किती प्रमाणात खाल्ले पाहिजे किंवा कसे खाल्ले पाहिजे किंवा कुठल्या वेळेला खाल्ले पाहिजे याचे नियम पळणे आवश्यक आहे. पण म्हणून या नियमांचा अतिरेक करीत अन्नपासून शरीराला वंचित ठेवणे हे ही चुकीचे आहे. आपल्याला आवडणाऱ्या सगळ्या वस्तू माफक प्रमाणात खाल्ल्या गेल्या तर त्या अपायकारक नाहीत. मात्र जर एखाद्या व्याधीमुळे आपल्या आहारावर डॉक्टरांनी काही निर्बंध घातले असतील तर ते मात्र काटेकोरपणे पाळायला हवेत. काही लोकांना आपण खात असलेल्या प्रत्येक पदार्थामधील कॅलरीज मोजत बसण्याची सवय असते.शरीरासाठी ठराविक कॅलरीज आवश्यक असतात आणि त्याबद्दल काटेकोर राहणे हे ठीक आहे, पण कधी कॅलरीज जास्त घेतल्या गेल्यामुळे अस्वस्थ होऊन न जाता त्या कॅलरीज आपल्या व्यायामाद्वारे कश्या वापरल्या जातील याचा विचार करावा. अशा प्रकारे योग्य आहाराला योग्य व्यायामची जोड मिळाली की चांगल्या आरोग्याचे लक्ष्य नक्कीच पूर्ण होऊ शकेल.

# संत नामदेव



ारपीं-परावर्शींसंत नामदेवांचे कुटूंब वारकरी संप्रदायाचे होते. जवळ- जवळ अठरा माणसांचे कुटुंब पांडुरंगाच्या भक्तीत लीन होते. घरच्या या वातावरणाचा प्रभाव संत नामदेवावर झाला. बालपणी झालेले संस्कार आयुष्यभर त्यांच्या सोबत होते. नामदेवांचे वडील दामाशेठी व आई गोणाई हे प्रामाणिक विठ्ठल भक्त होते.

संत नामदेवांची भक्ती सर्वश्रुत होती व ते भगवान विठ्ठलाचे सर्वात लाडके होते. एकदा त्यांचे वडील बाहेर काही कामानिमित बाहेर गेले होते तेव्हा देवाचा नैवेद्य घेऊन नामा गेले तेव्हा त्यांनी स्वतः च्या हातांनी पांडुरंगाला जेऊ घातले यामुळे ते लोकांत प्रसिद्ध झाले. संत नामदेवांनी आपले सगळे जीवन वारकरी सेवेत घालवले त्यांना कधीही अहंकार आला नाही. ते नेहमी देवाच्या गुण नामातच रमले. संत ज्ञानेश्वर, निवृतीनाथ, सोपानदेव, गोरोबा, मुक्ताई, चोखामेळा हे त्यांचे समकालीन संत होते. त्यांचे अध्यात्मिक गुरु विसोबा खेचर होते. आपल्या वारकरी जीवनात अनेक प्रकारचे अभंग, गौळणी अशा अनेक प्रकारचे लिखाण नामदेवरायांनी केले. संत जनाबाईंना त्यांच्या घरी आश्रय दिला गेला व त्यांना देखील अध्यात्मिक ज्ञान दिले. हे सर्व नामदेवरायामुळे झाल्यामुळेच जनाबाईचा उल्लेख नेहमी, ' दासी जनी नामयाची' असाच होतो.

नामदेवरायांचे कीर्तन हे त्यावेळेला चर्चेचा विषय ठरत असे. खुद्ध विठ्ठल भगवान कीर्तनाला हजर राहत असे.


'नामदेव कीर्तन करी पुढे देव नाचे पांडुरंग ।'इतकी शक्ती त्यांच्याकडे होती. त्यांचा शुद्ध भाव होता जो देवाला देखील आवडत असे.भागवत धर्माची पताका त्यांनी महाराष्ट्राबाहेर नेली लोकांना भक्तीत आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला. श्री गोविंद ग्रंथ साहिब या शिख लोकांच्या पवित्र ग्रंथात नामदेवरायांची अभंग व वर्णने केलेली आहेत. पंजाब, राजस्थान, हरियाना या ठिकाणी नामदेवरायांची मंदिरे देखील बांधलेली आहे. त्याकाळी भक्ती बरोबरच देशप्रेमाचे बीज मन ताजेतवाने ठेवण्यासाठी नियमित व्यायाम करा, पुरेशी झोप घ्या

# मेंदूची काळजी घेण्यासाठी

पौष्टिक अन्न खा आणि ध्यान व प्राणायामासारख्या गोष्टींचा सराव करा. यासोबतच, मेंदूला सक्रिय ठेवण्यासाठी कोडी सोडवणे किंवा नवीन गोष्टी शिकणे आणि सामाजिकरित्या सक्रिय राहणे देखील महत्त्वाचे आहे.

दैनंदिन सवयी

नियमित व्यायाम: रोज ३० मिनिटे चालणे किंवा योगा केल्याने 'हॅपी हार्मोन्स' तयार होतात आणि मन शांत राहते.



पुरेशी झोप: मेंदूला निरोगी ठेवण्यासाठी दररोज रात्री ६-७ तासांची शांत झोप घेणे आवश्यक आहे.

पौष्टिक आहार: मेंदूच्या आरोग्यासाठी प्रथिने, फळे आणि भाज्या यांचा आहारात समावेश करा.

ध्यान आणि प्राणायाम: दररोज १०-१५ मिनिटे ध्यान किंवा नाडी शुद्धीसारखे प्राणायाम केल्याने मन स्थिर राहते.

मानसिक आरोग्य

छोटे ध्येय निश्चित करा: एकदम मोठ्या ध्येयांऐवजी लहान लहान ध्येय ठरवून ती पूर्ण करण्याचा प्रयत्न करा.

सकारात्मक दृष्टिकोन: सकारात्मक विचारसरणीचा सराव करा आणि चुकीच्या गोष्टींना तुमचा प्रतिसाद कसा असेल, हे तुम्ही ठरवू शकता.

मेंदूला सक्रिय ठेवा:

कोडी सोडवणे किंवा नवीन गोष्टी शिकणे यासारख्या मानसिक व्यायामामुळे मेंदू तल्लख राहतो.

सामाजिक संबंध: कुटुंबासोबत आणि मित्रमैत्रिणींसोबत वेळ घालवा.

शांत जागा निवडा: ध्यानासाठी एक शांत, हवेशीर जागा निवडा आणि शक्य असल्यास ती सजवा.

# बिहारमध्ये नितीशराज कायम का राहिले ?




अलीकडच्या काळात लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव, प्रशांत किशोर किंवा सम्राट चौधरी अशा तरुणांचा बिहारच्या राजकारणात अधिक बोलबोला होता. सत्तेच्या राजकारणापासून नितीशकुमार दूर जातील असे अनेकांना वाटले. पण, मतदारांवर आर्थिक सवलतींचा मुबलक वर्षाव करत त्यांनी बाजी आपल्या नावे केली. या निवडणुकीतील यशाला कारणीभूत ठरलेल्या नितीशनीतीचा हा मागोवा...बिहारमध्ये एनडीएने अपेक्षेप्रमाणे ठसा उमटवला. अनेक प्रतिकूल मुद्दे आणि आव्हानांना तोंड देत एका वेळी अवघड वाटणारी लढाई भाजप आणि नितीशकुमार यांनी जिंकत विजयश्री खेचून आणली. या निवडणुकीमध्ये नेहमीपेक्षा अनेक वेगळे मुद्दे, दावेदार पुढे आले होते. प्रशांत किशोर यांच्या जनसुराज्य पक्षाने मतदारांना आकर्षित केले. त्यांनी अनेक सुशिक्षित नवे चेहरे उमेदवार म्हणून उतरवले. त्यांच्या सभांना शहरी भागात मोठा प्रतिसाद लाभला. त्यामुळे ते निवडणुकीत किती मते मिळवतात आणि त्याचा भाजपच्या व्होट बँकेवर किती परिणाम होऊ शकतो, यावर सत्तास्थापनेची समीकरणे आखली जात होती.

छट पुजा उत्सवानंतर लगेचच मतदान झाल्यामुळे परप्रांतातून आलेले मतदार राज्यात थांबले होते. त्यामुळेही मतदानाची आकडेवारी वाढली असे सांगण्यात येते. सर्वांत महत्त्वाचे म्हणजे मुख्यमंत्री महिला रोजगार योजनेअंतर्गत राज्यातील दीड कोटी महिलांच्या बँक खात्यात निवडणुकीच्या तोंडावर नितीशकुमार यांच्या सरकारने थेट दहा हजार रुपये जमा केल्यामुळे महिला आनंदी होत्या. महिला मतदारांचे भरघोस मतदान एनडीएच्या उमेदवारांना मिळेल, असा विश्वास नितिशकुमार यांच्या संयुक्त जनता दल पक्षाला आणि भाजपला होता. तब्बल वीस वर्षे मुख्यमंत्रिपदावर असलेल्या नितीशकुमार यांना पुन्हा सत्ता मिळवण्यासाठी महिलांसाठी दस हजारी योजना राबवावी लागली. या पार्श्वभूमीवर भाजप-जनता दलाने बहुमत मिळवल्यानंतर बिहारच्या राजकारणाचा नवा अध्याय कसा लिहिला जातो, हे आता पाहावे लागणार आहे.

पंतप्रधान नरेंद्र मोदींनी यापूर्वी विरोधी पक्षांच्या राज्यात निवडणुकीच्या तोंडावर दिल्या जाणार्या सवलतींवर सडकून टीका केली होती. त्यांनी अनेकदा रेवडी संस्कृतीची खिल्ली उडवली. पण मध्य प्रदेश, महाराष्ट्र आणि हरयाणामध्ये तेथील भाजप सरकारने राबवलेल्या 'लाडकी बहिण' योजनेने मात्र भाजपला पुन्हा सत्ता मिळवून दिल्यापासून मोदींनी रेवडी वाटपावर टीका करणे बंद केले. भाजपने या तीन राज्यांमध्ये रेवड्या वाटून सत्ता मिळवली तसेच नितीशकुमार यांनी बिहारमध्ये निवडणुकीच्या तोंडावर मुख्यमंत्री महिला रोजगार योजना जाहीर केली. महिलांना स्वयंरोजगार किंवा उद्योग सुरू करण्यासाठी ही योजना आहे. त्याची सुरुवात म्हणून दीड कोटी महिलांच्या खात्यात प्रत्येकी दहा हजार रुपये सरकारने जमा केले. राज्यातील कायम निवासी तसेच १८ ते ६० वयोगटातील महिलांसाठी ही योजना आहे, त्यांनी आपला रोजगार उद्योगाचा आराखडा सादर केल्यावर सहा महिन्यांत आणखी दोन लाख रूपये देण्यात येणार आहेत.

महाराष्ट्राप्रमाणे 'लाडकी बहीण' योजना सरसकट सर्व महिलांसाठी लागू केलेली नाही. २००६ मध्ये पहिल्यांदा मुख्यमंत्री झाल्यानंतर नितीशकुमार यांनी महिलांसाठी 'सायकल योजना' सुरू केली. त्याचाही त्यांना लाभ झाला. महिला व्होट बँकेसाठी 'सायकल ते दस हजारी' असे त्यांच्या कारकीर्दीचे वर्णन केले जात आहे. नितीशकुमार यांनी राज्यात दारूबंदी जाहीर केली. त्याचे महिलांनी जोरदार स्वागत केले. त्याचाही लाभ नितीशकुमार यांना निवडणुकीत झाला. एकंदरीतच महिला व्होट बँक हा नितीशकुमार यांचा मोठा आधार असण्यावर शिक्कामोर्तब झाले.

थेट रेवड्या वाटप

हरयाणामध्ये महिलांना दरमहा २१०० रुपये आणि बेरोजगारांना दरमहा १२०० ते ३५०० रुपये देण्याचे आश्वासन भाजपने निवडणुकीत दिले होते. महाराष्ट्रात लाडकी बहीण योजनेखाली दरमहा १५०० रुपये दिले जातात. निवडणुकीमध्ये मतदारांना विकासकामांपेक्षा थेट रेवड्या महत्त्वाच्या वाटतात हेच महाराष्ट्र, मध्य प्रदेश आणि हरयाणाने दाखवून दिले आहे. तेजस्वी यादव यांनी आपला पक्ष सत्तेवर आल्यास महिलांना दरमहा अडीच हजार रूपये देऊ, असे आश्वासन दिले होते. अतिमागास कुटुंबातील एकाला सरकारी नोकरी देण्याचेही आश्वासन तेजस्वी यादव यांनी दिले होते, मात्र त्याचा लाभ झाल्याचे दिसत नाही.

नितीशकुमार यांच्यावर राममनोहर लोहिया आणि जयप्रकाश नारायण यांच्या विचारांचा प्रभाव आहे. पण त्यांनी सत्तेसाठी कधी राष्ट्रीय जनता दल तर कधी भारतीय जनता पक्ष अशी अलटून पालटून युती केली. एनडीए सत्तेवर आल्यास पुन्हा नितीशकुमार मुख्यमंत्री होतील, की भाजप मुख्यमंत्रिपद आपल्याकडे घेईल, याबाबत मात्र संशय पाहायला मिळाला. इथे नमूद केले पाहिजे की, एनडीएचा निवडणूक जाहीरनामा घोषित झाला तेव्हा तिथे नितीशकुमार हजर होते, पण पण केवळ तीस सेकंदांमध्ये पत्रकार परिषद संपली आणि सर्व नेते उठून गेले. एनडीएचा मुख्यमंत्रिपदाचा उमेदवार कोण हा प्रश्न विचारला जाईल अशी त्यांना खात्री होती, त्याचे उत्तर टाळण्यासाठी प्रश्नोत्तरे होऊ न देताच पत्रकार परिषद संपवली गेली. पुढील काळात केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांना पत्रकारांनी मुख्यमंत्री कोण होणार, असा प्रश्न विचारला तेव्हा त्यांनी निवडून येणारे आमदार ठरवतील असे उत्तर दिले होते. नितीशकुमार यांना हे उत्तर आवडले नसावे.

जंगलराज नको

पुढे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या पहिल्या सभेला नितीशकुमार उपस्थित राहिले. नंतर राज्यात मोदींच्या डझनभर सभा आणि रोड शो झाले, भाजपच्या अनेक बड्या नेत्यांचे प्रचार दौरे झाले पण नितीशकुमार तिकडे फिरकले नाहीत. याखेरीज थोडे मागे जाऊन पाहिले असता लक्षात येते की, गेल्या सतरा निवडणुकांमध्ये पाच टक्के मतदान वाढले किंवा कमी झाले तर सत्ता परिवर्तन होते.

१९९० मध्ये काँग्रेसची राजवट संपली तर २००५ मध्ये लालू-राबडी राज्य संपुष्टात आले. नितीशकुमार गेली वीस वर्षे मुख्यमंत्री आहेत. त्यांचे वय झाले आहे, तब्येतही नरम असते. त्यांनी आपल्या पक्षाचा वारस किंवा नंबर दोन कोण आहे हे जाहीर केलेले नाही. मात्र तरीही नितीशकुमार पुन्हा मजबुतीने विजयी होतील असा दावा जाणकारांनी केला होता. दुसर्या बाजूने मतदारांनी चूक केली तर बिहारमध्ये पुन्हा जंगलराज येईल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदींनी प्रत्येक सभेतून दिला.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह भाजपाच्या राज्यातील प्रमुख नेत्यांनी बिहारमध्ये प्रचारात हजेरी लावली. भाजपाने सर्व राज्यांमधून शेकडो नेते आणि हजारो कार्यकर्त्यांची फौज गेला महिनाभर बिहारमध्ये तैनात ठेवली. एनडीएच्या ताज्या यशाची नोंद घेताना हे मुद्दे लक्षात घ्यावे लागतीलच, पण नितीशकुमार यांचे नेतृत्व अनेक प्रतिकूल मुद्द्यांना पुरून उरले, याकडेही लक्ष द्यावे लागणार आहे.

ताज्या निकालांचे विश्लेषण करताना काही बाबी नव्याने अधोरेखित झाल्या. बिहारमध्ये सवर्ण मतदारांची संख्या दहा टक्के इतकी आहे. त्या आधारावर भाजप सत्तेपर्यंत पोहोचू शकत नाही. म्हणूनच नितीशकुमार यांची मदत घेतल्याशिवाय भाजप या राज्याची सत्ता काबीज करू शकत नाही, हे वास्तव आहे. उत्तर भारतात बिहार हे एकमेव हिंदी भाषक राज्य आहे, जिथे भाजपला आजवर आपला मुख्यमंत्री बसवता आलेला नाही. त्याचप्रमाणे कोणाच्या नेतृत्वाखाली निवडणूक लढवतो याला आता फारसे महत्त्व राहिलेले नाही. निकालानंतर विजयी आमदारांचे संख्याबळ काय असेल यावर मुख्यमंत्रिपद कोणाला मिळणार, हे ठरते असे भाजपचे म्हणणे राहिले आहे.

२०२० मध्ये बिहारमध्ये झालेल्या विधानसभा निवडणुकीत भाजपाचे ७४ तर जनता दल युनायटेड पक्षाचे ४३ आमदार विजयी झाले. आपले आमदार जास्त निवडून आल्यावरही भाजपने नितीशकुमार यांना मुख्यमंत्रिपद दिले. पंतप्रधान नरेंद्र मोदींचा स्वयंघोषित हनुमान असलेले लोकजनशक्ति पक्षाचे प्रमुख चिराग पासवान यांनी २०२० ची निवडणूक स्वबळावर लढली होती.

त्यांच्या पक्षाने किमान २८ मतदारसंघांमध्ये संयुक्त जनता दलाचे नुकसान केले होते. बिहारमध्ये निवडणुकीच्या राजकारणातील नवे खेळाडू जनसराज्य पक्षाचे प्रमुख प्रशांत किशोर हे यावेळी चिराग पासवान यांची भूमिका बजावतील, असे राजकीय विश्लेषकांना वाटत होते.

प्रत्यक्षात मात्र तसे घडले नाही. राजकारणात तरुण नेतृत्व येते तेव्हा जुने आणि नव्यांचा संघर्ष तीव्र होत जातो. अलीकडच्या काळात लालूप्रसाद यादव यांचे पुत्र तेजस्वी यादव, प्रशांत किशोर किंवा सम्राट चौधरी अशा तरुणांचा बिहारच्या राजकारणात अधिक बोलबोला होता. सत्तेच्या राजकारणापासून लालूप्रसाद यादव दूर गेले आहेतच; आता नितीशकुमारही त्याच वाटेवर चालतील असे अनेकांना वाटले. पण, मतदारांवर आर्थिक सवलतींचा मुबलक वर्षाव करत त्यांनी बाजी आपल्या नावे केली. अर्थात भाजपने मुख्यमंत्रिपदाच्या सिंहासनावर बसू देण्यास अटकाव केल्यास ते पुन्हा पलटूरामच्या भूमिकेत जातील का, प्रकृती त्यांना साथ देईल का या प्रश्नांचे उत्तर तपासावे लागेल.

------

**बिहार निवडणूक विश्लेषण , जनार्दन पाटील**

## जांभळाचे सरबत डायबिटीजसाठी उपयोगी औषध

## डॉक्टर टीप्स

### जांभळाचे सरबत

साहित्य - पाव किलो जांभळे, एक ग्लास साखर.

कृती - जांभळे बुडतील इतक्या पाण्यात कुकरमध्ये उकडून घ्या . पाण्यासह जांभळे कुस्करून बिया काढा. मिक्सर मध्ये फिरवून (हवे असल्यास गाळून ) घ्या. एक ग्लास साखरेचा दोन तरी पाक करून घ्या. थंड झाल्यावर पाक आणि जांभूळ गर मिसळा. एक ग्लास सरबत बनवताना पाऊण ग्लास मिश्रण आणि पाव ग्लास पाणी घाला. आवडत असेल तर साखर घाला. ढवळा. हे जांभूळ सरबत अगदी नैसर्गिक असल्यामुळे चवदार लागते. तुम्ही आईसक्रीम मध्येही घालू शकता.

जांभूळ हे उत्तम फळ आहे सुश्रुतांच्या मते जांभूळ पित्त, रक्तदहनाशक, शरीराची कांती सुंदर बनवणारे आहे. जांभूळ खाल्ल्याने रक्त लाल बनते. जांभळे मीठ टाकून खाणे हितावह आहे जांभळा मध्ये लोह फॉस्फरस, फॉलिक एसिड असते. जांभळे किडकी खाऊ नयेत. जांभूळ पिकण्यासाठी ग्रीष्माचे ऊन आणि वर्षाऋतूतील पावसाचा शिडकावा लागतो. बुद्ध लोक या झाडाला पवित्र मानतात.

## विनोद




माहेर :

जिया : काय गं, तुझ्या नवऱ्यापासून तू इतके पैसे घेतेस तरी कशी ?

रिया : अगदी सोपं आहे. मी आताच्या आता माहेरी निघून जाते, असं म्हटल्याबरोबर ते मला ताबडतोब रेल्वे-खर्च देतात, आणि मी माहेरी जातच नाही.!

## संदेश

apne bhi khafa hai
mujh se begane bhi na khush
ke main gahere halahal ko kabhi keh na saka tang
bat wahi kaheta ho smajh ta ho jise haq

## सुविचार

तुझ्या गणितातील समस्यांची काळजी करू नकोस. मी तुला खात्री देऊ शकतो की माझ्या (समस्या) अधिक आहेत.

**-अल्बर्ट आइनस्टाइन**




### संस्कृत सुभाषित

**बीज तेचि फळे येईल शेवटी ।**
**लाभ हानी तुही ज्याची तया।।**

**अर्थ -** जे पेराल तेच उगवते आणि लाभ व हानी ही ज्याची त्याची वेगवेगळी असते, म्हणून सत्कर्म करा. सद्विचाराने चाला.

# मनोरंजक महाशब्दकोडे



**आडवे शब्द**

१. शहिदांचे दिल्ली येथील स्मारक '------ ज्योती'
६. निर्णय
९. समुद्रकिनारा
१२. हिंदीत पशू
१४. डुक्कर
१५. गायीचे पिल्लू
१६. मुरुमाची जमीन
१८. रमापती
२०. खराब झालेला आंबा
२१. व्यक्ती, मनुष्य
२३. अनुयायी, पायदळातील शिपाई
२५. स्वामी
२६. समुद्र
२७. जास्तीत जास्त व कमीत कमी
२९. चालविणारा अवयव
३०. दारूचा एक प्रकार
३२. मलई
३३. दिवस
३४. मध
३६. सर्वस्व
३७. गाय
३८. खाली मान घातलेला
४०. रत्न
४२. श्रीविष्णुचे बटुरूप
४६. होडी
४७. आई
४८. वरपांगी, दिखाऊ
४९. मीठाची चव
५०. तीव्र ऊन
५२. भूतकाळ
५४. वाळवंट
५५. लक्ष्मीचे एक नाव
५७. नूतन
६०. षष्ठीची देवता
६२. वृक्ष
६३. वर्ष, साल
६५. अखेर
६७. उद्यानंतरचा दिवस
६९. वचक
७०. क्रिकेटच्या खेळातील सहा धावांचा फटका
७२. दाणे वगैरे कुटण्याचे पूर्वीचे साधन
७४. वाईट, नासके
७६. मकर
७७. नवा जोम, चपळता
८०. हात
८१. माळेत हे ओवतात
८२. माती नसलेली जमीन

**उभे शब्द**

१. अव्यस्थित राहणारा
२. अंत:करण
३. गोव्यातील शिवशंभो
४. सोन्याचा वस्त्रातील धागा
५. शहर
६. प्रतिनिधी निवडण्याची क्रिया
७. तुरूंग
८. लाट, हुक्की
१०. एक शेंगभाजी
११. आवड, रूची
१२. तारूण्य
१६. ठेकेदार
१७. आईचा भाऊ
१९. नवरदेवाची आई
२२. संतोष, आनंद
२४. गुणज्ञ
२५. चित्रपटाचा हिरो
२८. शेतकरी
२९. गरीब, क्षुल्लक
३०. दात
३१. जन्म-मृत्यू
३३. पृथ्वीभोवतीचे हवेचे आवरण
३५. रंगवलेले
३९. पुरुषांचे नेसण्याचे हे वस्त्र आता कालबाह्य होत चाललेय
४०. प्रजा
४१. खास, विशेष हकीगत
४२. शेतजमीन
४३. गोदाम
४४. पदार्थ शिजतानाचा आवाज
४७. पत्ता
५१. रड्या माणूस
५३. कर्ण
५६. खवा
५८. 'दारु' मोजण्याने बदनाम झालेले माप
५९. गाडीचे छत
६०. प्रश्न
६१. मुस्लिमांचा एक सण
६४. नट्टापट्टा
६६. बंगाली रुपया
६८. शुष्कता
७१. सुंदर तरुणी
७३. फणसाचा एक प्रकार
७४. गाढव
७५. बगळा
७८. रमणीय, मनोहारी
७९. पद्धत

**आडवे उत्तर**

१.अमर जवान ६.निकाल ९.सागरतट १२.जानवर १४.वराह १५.वासरू १६.मुरमाड १८.रमावर २०.नासका २१.माणूस २३.पाईक २५.नाथ २६.दर्या २७.कमाल किमान २९.पाय ३०.रम ३२.साय ३३.वासर ३४.मकरंद ३६.तनमनधन ३७.गो ३८.अधोवदन ४०.रतन ४२.वामनावतार ४६.तर ४७.माय ४८.वरवर ४९.खारट ५०.रणरण ५२.गतकाल ५४.रण ५५.रमा ५७.नविन ६०.सटवाई ६२.तरू ६३.सन ६५.शेवट ६७.परवा ६९.दरारा ७०.षटकार ७२.खलबत्ता ७४.खराब ७६.मगर ७७.तरतरी ८०.कर ८१.मणी ८२.खडकाळ

**उभे उत्तर**

१.अजागळ २.मन ३.रवळनाथ ४.जर ५.नगर ६.निवडणूक ७.कारा ८.लहर १०.गवार ११.रस १२.तरूणाई १६.मुकादम १७.मामा १९.वरमाय २२.समाधान २४.कदरदान २५.नायक २८.किसान २९.पामर ३०.रद ३१.जनन मरण ३३.वातावरण ३५.रंगीत ३९.धोतर ४०.रयत ४१.नवलविशेष ४२.वावर ४३.वखार ४४.तार ४५.रटरट ४७.मागमूस ५१.रडतराऊत ५३.कान ५६.मावा ५८.नवटाक ५९.टप ६०.सवाल ६१.ईद ६४.नखरा ६६.टका ६८.रखरख ७१.रमणी ७३.बरका ७४.खर ७५.बक ७८.रम्य ७९.रीत



# चंदेरी दुनिया



## मी दवाखाण्यात मरता मरता वाचलो

## प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेता धर्मेंद्र देवोल डोळ्यांदेखत पाहिलेला स्वत:चा मृत्यू

धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत हळूहळू होतेय सुधारणा, देओल कुटुंबीय साजरा करणार ९० वा वाढदिवस; तयारी सुरूः
उ्हरीशपवीर कशरश्रींह णविरींश : ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र यांच्यावर सध्या घरातच उपचार सुरू आहेत आणि त्यांच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणाही होत आहे.
ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र प्रकृतीत हळूहळू होतेय सुधारणा (फोटो : इन्स्टाग्राम)
अर्लीी उ्हरीशपवीर कशरश्रींह णविरींश : ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र हे सध्या त्यांच्या प्रकृतीच्या कारणामुळे चर्चेत आ-हेत. वाढत्या वयासंबंधित काही आजारांमुळे त्यांना मुंबईच्या ब्रीच कँडी रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. १२ नोव्हेंबर रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आला आणि आता त्यांच्यावर घरीच उपचार सुरू आहेत. कलाकारांपासून ते चाहत्यांपर्यंत सर्वचजण ते लवकर बरे व्हावेत, यासाठी प्रार्थना करत आहेत.
यादरम्यान एक नवी माहिती मिळत आहे की, धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत हळूहळू सुधारणा होत आहे आणि देओल कुटुंबीय धर्मेंद्र यांच्या ९० व्या वाढदिवसाची तयारी करत आहेत. 'बॉलीवूड हंगामा'च्या वृत्तानुसार, धर्मेंद्र यांना आता आधीपेक्षा बरं वाटत आहे. तसंच त्यांच्या ९० व्या वाढदिवसाविषयीही माहिती देण्यात आली आहे. सूत्रांच्या माहितीनुसार, देओल कुटुंब पुढच्या महिन्यात दोन वाढदिवस साजरे करणार आहे.
येत्या ८ डिसेंबर रोजी धर्मेंद्र हे ९० वर्षांचे होतील. तसंच त्यांची मुलगी ईशा देओलचा वाढदिवस २ नोव्हेंबर रोजी होता, पण वडिलांची प्रकृती बरी नसल्यामुळे तिने आपला वाढदिवस साजरा केला नाही, त्यामुळे आता धर्मेंद्र यांच्या प्रकृतीत आणखी सुधारणा झाली तर पुढच्या महिन्यात धर्मेंद्र आणि ईशा दोघांचेही वाढदिवस एकत्र साजरे केले जातील.
ज्येष्ठ बॉलीवूड अभिनेते धर्मेंद्र यांची इन्स्टाग्राम पोस्ट
मरता मरता वाचलो, प्रसिद्ध बॉलीवूड अभिनेत्यानं डोळ्यांदेखत पाहिलेला स्वत:चा मृत्यू; म्हणाला,त्या घटनेनंतर दरम्यान, १२ नोव्हेंबर रोजी धर्मेंद्र यांना रुग्णालयातून घरी सोडण्यात आले असून डॉक्टरांची टीम त्यांच्यावर घरीच उपचार करत आहे. त्यांच्या प्रकृतीत सुधारणा झाल्याचे अपडेट आल्यानंतर चाहत्यांसह सर्वांनीच आनंद व्यक्त केला. तसंच ते पूर्णपणे बरे व्हावे म्हणून अनेक जण प्रार्थना करत आहेत.
धर्मेंद्र यांची प्रकृती बिघडल्यानंतर त्यांना रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. त्याचदरम्यान त्यांच्या निधनाच्या अफवा पसरल्या होत्या. यावर त्यांच्या पत्नी हेमा मालिनी आणि मुलगी ईशा देओल यांनी अशा खोट्या अफवांवर नाराजी व्यक्त करत चुकीच्या बातम्या पसरवू नका, अशी विनंती केली होती.

## बॉलीवूडचे खलनायक प्रेम चोप्रांची तब्येत स्थिर



मुंबई: गेल्या काही दिवसांपासून ज्येष्ठ बॉलिवूड अभिनेते प्रेम चोप्रा यांची तब्येत बरी नव्हती. वयानुसार उद्भवणाऱ्या आजारांमुळे त्यांना लीलावती रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. मात्र १५ नोव्हेंबर रोजी त्यांना डिस्चार्ज देण्यात आल्याने बॉलीवूडवरील अजून एक संकट टळले. यापूर्वी धर्मेंद्र यांच्या तब्येतीमुळे सर्वत्र चिंतेचे वातावरण होते. मात्र आता बॉलीवूडमधील दोनही ज्येष्ठ व्यक्तींच्या तब्येतीमध्ये सुधारणा झाली आहे.प्रेम चोप्रा यांना व्हायरल इन्फेक्शन आणि वयाशी संबंधित आजारांमुळे एक आठवड्याभर रुग्णालयात उपचार सुरू होते. कार्डिओलॉजिस्ट नितीन गोखले यांच्या देखरेखीखाली प्रेम चोप्रा यांच्यावर लीलावती रुग्णालयात उपचार सुरू होते. यापूर्वी, लीलावती रुग्णालयाचे डॉ. जलील पारकर यांनी एका निवेदनात म्हटले होते की, 'त्यांना हृदयविकार आणि व्हायरल इन्फेक्शन आहे, म्हणून त्यांच्या फुफ्फुसांवर उपचार सुरू आ-

## माझे करिअर संपले की काय? अभिनेता सांगतो, श्रीदेवींना पडली महागातली चूक



मुंबई-बॉलिवूडचे बहुगुणी कलाकार फरहान अख्तर हे आपल्या अभिनयासाठी, प्रोडक्शनसाठी आणि विविध कलात्मक प्रकल्पांसाठी ओळखले जातात. भाग मिल्खा भाग चित्रपटात मिल्खा सिंगची भूमिका साकारून त्यांनी प्रेक्षकांची मनं जिंकली आहेत. मात्र, करिअरच्या सुरुवातीच्या काळात फरहान अख्तरने केवळ अभिनेता म्हणून नव्हे तर असिस्टंट कॅमेरामन म्हणूनही बॉलिवूडमध्ये आपला अनुभव घेतला होता. साल १९९१ मध्ये प्रदर्शित झालेल्या लम्हे चित्रपटाच्या सेटवर फरहान अख्तर, श्रीदेवी, अनिल कपूर आणि प्रसिद्ध सिनेमॅटोग्राफर मनमोहन सिंह उपस्थित होते. नुकत्याच दिलेल्या मुलाखतीत फरहानने त्या सेटवर घडलेल्या एका अनोख्या प्रसंगाचा खुलासा केला, ज्यामुळे त्यांना लगेचच भीती वाटली होती.
फरहान म्हणाले, ममी त्या वेळी मनमोहन सिंहचा सातवा-आठवा असिस्टंट होतो. एका डान्स सीनसाठी मला फ्लोअर साफ करण्याचे काम दिले गेले. मी एक बादली पाणी आणि कापड घेऊन डाग पुसत होतो. अचानक, श्रीदेवी सराव करत असताना त्यांचा पाय घसरला आणि त्या माझ्या समोर पडल्या. त्या क्षणी मला वाटलं की माझं इंडस्ट्रीतील करिअर संपलं!फ फरहानने पुढे सांगितले की, ही घटना घडल्यानंतर श्रीदेवी हसल्या आणि उपस्थित सगळे कलाकारही हसले, त्यामुळे त्यांनी लगेचच आपली भीती झटकली. या अनुभवामुळे फरहानला बॉलिवूडच्या सेटवरील अप्रत्याशित आणि मजेशीर क्षणांचा अनुभव मिळाला. हा प्रसंग आजही त्यांच्यासाठी एक आठवण म्हणून जिवंत आहे.
फरहान अख्तर सध्या म१२० बहादूरफ या युद्धपटाच्या शूटिंगमध्ये व्यस्त आहेत. हा चित्रपट खऱ्या लष्करी घटनेवर आधारित असून, २१ नोव्हेंबर २०२५ रोजी प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. या चित्रपटात फरहान पुन्हा एकदा प्रेक्षकांच्या समोर एक वेगळी छटा उलगडणार आहेत. फरहानच्या या खुलास्यानंतर चाहत्यांमध्ये उत्सुकता वाढली असून, त्यांचा अभिनय आणि श्रीदेवीसोबतचा जुना सेटवरचा अनुभव बॉलिवूड चाहत्यांसाठी एक धक्कादायक आणि मजेशीर आठवण म्हणून चर्चेत आहे.

## ज्येष्ठ अभिनेत्री कामिनी कौशल काळाच्या पडधाआड



मुंबई : हिंदी चित्रपटसृष्टीला मोठा धक्का बसला आहे. अनेक पिढ्यांना भुरळ घालणाऱ्या सुवर्णकाळातील दिग्गज अभिनेत्री कामिनी कौशल यांचे ९७व्या वर्षी निधन झाले. अलीकडेच त्या आमिर खानच्या लाल सिंह चड्ढा मध्ये आणि कबीर सिंहमध्ये शाहिद कपूरच्या आजीच्या भूमिकेत झळकल्या होत्या.
कामिनी कौशल या १९४० च्या दशकातील अत्यंत प्रभावशाली अभिनेत्रींपैकी एक होत्या. १९४७ आणि १९४८ या सलग दोन वर्षांमध्ये बॉक्स ऑफिस इंडियाच्या सर्वाधिक लोकप्रिय अभिनेत्रींमध्ये त्या पहिल्या क्रमांकावर होत्या. २०२२ मध्ये आउटलुक इंडियाने प्रसिद्ध केलेल्या '७५ सर्वोत्तम अभिनेत्रींच्या यादीतही त्यांना मानाचा दर्जा मिळाला.
कामिनी कौशल यांचा जन्म १६ जानेवारी १९२७ रोजी लाहोर येथे झाला. त्यांनी अगदी लहान वयात ऑल इंडिया रेडिओवर कार्यक्रम करायला सुरुवात केली होती. लाहोरच्या गव्हर्नमेंट कॉलेजमधून इंग्रजी साहित्यात बीए (ऑनर्स) पूर्ण केल्यानंतर, १९४६ मध्ये चेतन आनंद यांनी नीचा नगरमधून त्यांना हिंदी चित्रपटांत पदार्पणाची संधी दिली.करिअरच्या कालावधीत दो भाई, नदिया के पार, जिद्दी, शबनम, उपकार, पूरब और पश्चिम, रोटी कपड़ा और मकानसह अनेक हिट चित्रपटांमध्ये त्यांनी महत्वाच्या भूमिका साकारल्या. त्यांनी दिलीप कुमार, राज कपूर यांसारख्या दिग्गज कलाकारांसोबतही पडद्यावर काम केले होते.कौटुंबिक परिस्थितीमुळे त्यांच्या वैयक्तिक आयुष्याला वेगळे वळण लागले. आपल्या बहिणीच्या निधनानंतर तिच्या मुलांचा सांभाळ करण्यासाठी त्यांनी १९४८ मध्ये मेहुणे बी.एस. सूद यांच्याशी विवाह केला.शहीद (१९४८) चित्रपटाच्या शूटिंगदरम्यान कामिनी कौशल आणि दिलीप कुमार यांच्यात जवळीक निर्माण झाली होती. दिलीप कुमार यांना त्यांच्याशी विवाह करायची इच्छा होती, पण दोन्ही कुटुंबांच्या विरोधामुळे हे नाते तुटले.
धर्मेंद्र यांच्या पहिल्या को-स्टार
धर्मेंद्र यांचा चित्रपट 'शहीद' मध्ये कामिनी कौशल त्यांच्या पहिल्या को-स्टार होत्या. धर्मेंद्र यांनी स्वतः सोशल मीडियावर एक फोटो शेअर करून, माझ्या आयुष्यातील पहिला चित्रपट शहीद ची हिरोईन कामिनी कौशल यांची पहिली भेट दोघांच्या चेहऱ्यावर हसू एक प्रेमळ ओळख असे लिहिले होते.

## श्रेया घोषालच्या लाईव्ह कॉन्सर्टमध्ये चेंगराचेंगरी!

## ओडिसाच्या बाली यात्रेला गालबोट



ओडिसा: सुप्रसिद्ध भारतीय गायिका श्रेया घोषालचा ओडिसा कटक येथे १३ नोव्हेंबरला लाईव्ह कॉन्सर्ट आयोजित केला होता. ओडीसातील बाली यात्रा महोत्सवाच्या समारोप कार्यक्रमानिमित्ताने श्रेयाचा कॉन्सर्ट पाहण्यासाठी अनेक चाहत्यांनी गर्दी केली होती. यावेळी श्रेयाने डोला रे डोला, चिकनी चमेली, मस्तानी हो गई आणि मनवा लागे सारख्या तिच्या सुरेल गाण्यांनी प्रेक्षकांना मंत्रमुग्ध केले. मात्र यावेळी एक दुर्घटना घडली आणि संपूर्ण यात्रेला गालबोट लागले.श्रेयाचा लाईव्ह कॉन्सर्ट पाहण्यासाठी बाली यात्रेत मर्यादेच्या बाहेर गर्दी जमा झाली होती. यामुळे चेंगराचेंगरीसारखी परिस्थिती निर्माण झाली आणि या दुर्घटनेत काहीजण जखमी झाले. कटकच्या जिल्हा प्रशासन अधिकाऱ्यांनी सांगितलं की, श्रेया घोषाल परफॉर्म करण्यासाठी स्टेजवर आली तेव्हा कॉन्सर्टला आलेला जमाव स्टेजवर धावला आणि गोंधळ निर्माण झाला. यामुळे श्रेयाचा कॉन्सर्ट काही वेळासाठी थांबवावा लागला. मात्र काही वेळातच पोलिसांनी परिस्थिती नियंत्रणात आणली आणि कॉन्सर्ट पुन्हा सुरू झाला. श्रेया घोषालची कटकमध्ये सादरीकरण करण्याची ही पहिलीच वेळ होती.खछऊीं ड- १ीं ढशीीं : बुमराहचा 'डबल धमाका'! दक्षिण आफ्रिकेचे टॉप ३ फलंदाज तंबूत; जसप्रीत बुमराहच्या हाती २ महत्त्वाच्या विकेट्स!कोलकाता : भारत आणि दक्षिण आफ्रिका यांच्यात दोन सामन्यांची मालिका आयोजित करण्यात आली आहे. या मालिकेचा पहिला सामना कोलकाता येथील ईडन गार्डन्सवर खेळवला .दरम्यान, श्रेया घोषाल सध्या 'इंडियन आयडॉल' या कार्यक्रमाचे परीक्षण करत असून तिच्यासोबत या शोमध्ये विशाल दादलानी आणि बादशाहसुद्धा

## 'ताठ कणा' मध्ये दिसणार उमेश आणि दिप्तीची जोडी

मुंबई : सिनेसृष्टीतील प्रत्येक कलाकाराची आपली एक वेगळी इमेज आहे. प्रत्येकजण एखाद्या वैशिष्ट्यपूर्ण भूमिकेसाठी ओळखला जातो. पण हेच कलाकार जेव्हा अनपेक्षितपणे एखाद्या वेगळ्या भूमिकेत दिसतात तेव्हा सर्वांच्याच अपेक्षा उंचावतात. नेहमीच वेगळ्या धाटणीचे तसंच आशयघन चित्रपटांच्या शोधात असणारे अभिनेता उमेश कामत आणि अभिनेत्री दिप्ती देवी हे दोन कलाकार 'ताठ कणा' या चित्रपटात एका वेगळ्या रूपात प्रेक्षकांना भेटणार आहेत. जगप्रसिद्ध शल्यचिकित्सक डॉ. प्रेमानंद रामाणी यांचा जीवनपट उलगडून दाखविणाऱ्या 'ताठ कणा' या आगामी मराठी चित्रपटातून हे दोघे पहिल्यांदाच जोडीच्या रूपाने प्रेक्षकांसमोर येत आहेत. हा चित्रपट २८ नोव्हेंबरला प्रदर्शित होणार आहे. 'प्रज्ञा क्रिएशन्स'चे विजय मुडशिंगीकर व 'स्प्रिंग समर फिल्मस'चे करण रावत यांनी या चित्रपटाची निर्मिती केली आहे. चित्रपटाचे लेखन श्रीकांत बोजेवार यांनी केले असून दिग्दर्शक गिरीश मोहिते आहेत. उमेश कामत या चित्रपटात डॉ. प्रेमानंद रामाणी यांच्या भूमिकेत दिसणार असून नवऱ्याच्या पाठीशी ठामपणे उभी राहणाऱ्या पत्नीची व्यक्तिरेखा दिप्ती देवी साकारणार आहेत. डॉ. रामाणी यांच्यासारख्या ऋषीतुल्य व्यक्तिमत्वाची भूमिका मला करायला मिळाली ही माझ्यासाठी भाग्याची गोष्ट असल्याचे, उमेशने सांगितले.

## बिग बॉस विजेती तेजस्वी प्रकाश आता उद्योजिका; करणार हा व्यवसाय



मुंबई : बिग बॉस १५ ची विजेती आणि नागीण मालिकेतून घराघरात पोहोचलेली तेजस्वी प्रकाश आता केवळ अभिनयावर अवलंबून न राहता नव्या क्षेत्रात उतरली आहे. छोटे पडद्यावरील लोकप्रिय अभिनेत्री म्हणून स्वतःची वेगळी छाप सोडल्यानंतर, तेजस्वीने व्यावसायिक जगातही पाऊल टाकत स्वतःचा नवा उपक्रम सुरू केला आहे.अलीकडेच तिने सॅम'ज सलोन नावाचं स्वतःचं आलिशान ब्युटी सलून उघडलं. उद्घाटनावेळी तिच्या सोशल मीडियावरून शेअर केलेल्या फोटों आणि व्हिडीओंमध्ये तिचे आई-वडील, प्रियकर करण कुंद्रा आणि इंडस्ट्रीतील तिचे अनेक मित्रमंडळी उपस्थित असल्याचे दिसत आहे. सर्वांनीच तिला तिच्या या नव्या प्रवासासाठी शुभेच्छा दिल्या.
व्यवसाय सुरू करण्यामागचं कारण स्पष्ट करताना तेजस्वीने कॉमेडियन भारती सिंहसोबतच्या संभाषणात सांगितलं की, तिला अभिनय जरी अत्यंत प्रिय असला तरी फक्त त्यावर अवलंबून राहणं तिला योग्य वाटत नाही. ती म्हणाली, मला नेहमी काहीतरी नवं करायला आवडतं. जेव्हा तुम्ही प्रामाणिकपणे नवीन प्रयत्न करता, तेव्हा देवही साथ देतो.तेजस्वीने आनंद व्यक्त करत म्हटले किकी , आता माझा एक नवीन प्रवास सुरु झाला आहे आणि माझ्या व्यवसायाला चांगला प्रतिसादही मिळत आहे तेजस्वी प्रकाशने स्वतःच्या मेहनतीने आणि लोकप्रियतेच्या बळावर आपले स्वप्न पूर्ण केले. अभिनयासोबत हा व्यवसाय सांभाळणे हे तिच्यासाठी एक नवीन आव्हान असणार आहे.

## मी कट्टर भाजप समर्थक अभिनेत्री निवेदिता सराफ यांचे विधान चर्चेत!



ठाणे: बालदिनाचे औचित्य साधून प्रख्यात अभिनेत्री निवेदिता सराफ यांना यंदाचा गंधार जीवन गौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. निवेदिता सराफ यांना हा पुरस्कार त्यांचे पती आणि पद्मश्री अशोक सराफ यांच्या हस्ते देण्यात आला. यावेळी, मनोगत व्यक्त करताना 'मी कट्टर भाजप समर्थक' असल्याने बिहार मधील भाजपाच्या विजयचा आनंद झाल्याचे निवेदिता सराफ म्हणाल्या. त्यांच्या या वक्तव्यामुळे सर्वत्र चर्चांना उधाण आले आहे.
गंधार गौरव पुरस्काराने सन्मानित झाल्यानंतर मनोगत व्यक्त करताना अभिनेत्री निवेदिता सराफ म्हणाल्या की, आजचा हा क्षण माझ्यासाठी खूपच भावनिक आहे. मी खरंच मनापासून तुमची खूप खूप आभारी आहे. ज्यांच्याकडून पुरस्कार मिळाला ती व्यक्ती माझे गुरु, माझे पती, आज मी जी काही आहे, ती फक्त आणि फक्त त्यांच्यामुळे आहे. त्यांच्या हस्ते तुम्ही मला हा पुरस्कार दिलात, हे तुम्हाला सुचलं त्यासाठी मनःपूर्वक आभार. पुढे त्या म्हणाल्या, बिहारबद्दल खूप खूप अभिनंदन, मी जरा थोडी कट्टर बीजेपी असल्यामुळे मला फारच अभिमान वाटत आहे.
बिहारमध्ये भाजप अव्वल, महाराष्ट्रासह १३ राज्यांवर भाजपची सत्ता! जाणून घ्या सविस्तर...
बिहार: बिहार विधानसभा निवडणुकीत भाजपने ८९ तर जेडीयूने ८५ जागांवर आघाडी घेतल्याने एनडीएचा दणदणीत विजय झाला. जेडीयूपेक्षा ४ जागा अधिक मिळवल्याने ...
बालनाट्याबाबत सांगताना निवेदिता सराफ म्हणाल्या, माझ्या आयुष्याची सुरुवात बालनाट्यातून झाली. सुधा करमरकर यांच्या बालनाट्यातून मी कामाला सुरुवात केली. सुधाताईंनी स्टेजवर उभं राहायला शिकवलं. सगळेच क्रिकेटच्या शिबिराला गेल्यावर सचिन तेंडुलकर बनत नाहीत, आणि सगळेच गाणं शिकायला लागल्यावर सोनू निगम बनत नाहीत. पण चांगले श्रोते-प्रेक्षक बनतात. यामुळे तुमचा व्यक्तिमत्त्व विकास होण्यासाठी मदत होते.गंधार बालनाट्य संस्थेच्यावतीने गंधार गौरव सोहळ्याचे दरवर्षी आयोजन केले जाते. यावर्षी गंधार गौरव पुरस्काराचे दहावे वर्षे होते. हा पुरस्कार सोहळा शुक्रवार, १४ नोव्हेंबर रोजी ठाण्यातील गडकरी रंगायतन येथे पार पडला असून यावर्षी या पुरस्काराच्या मानकरी अभिनेत्री निवेदिता सराफ ठरल्या. या पुरस्कारावेळी व्यासपीठावर आमदार संजय केळकर, लेखक अभिजित पानसे, अभिनेते विजय पाटकर, राज्य आणि सांस्कृतिक मंडळाचे अध्यक्ष प्रदीप ढवळ, दिग्दर्शक निर्माते मंगेश देसाई, ज्येष्ठ संगीतकार अशोक पत्की, विलास ठुसे, गंधारचे संस्थापक मंदार टिल्लू यांची उपस्थिती होती.

**गंधार गौरव पुरस्कार २०२५**

# आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत रेणापूर नगराध्यक्षपदासाठी भाजपाकडून शोभा शामराव आकनगिरे यांचा उमेदवारी अर्ज दाखल





**लातूर/प्रतिनिधी :** रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांचा उमेदवारी अर्ज १५ नोव्हेंबर शनिवार रोजी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या प्रमुख उपस्थितीत दाखल करण्यात आला. यावेळी भाजपाचे पदाधिकारी लोकप्रतिनिधी मोठ्या संख्येने होते.

येत्या २ डिसेंबर रोजी रेणापूर नगरपंचायतीच्या नगराध्यक्ष आणि नगरसेवक पदासाठी मतदान होणार असून भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या नेतृत्वाखाली रेणापूर शहरात कोट्यावधी रुपये खर्चाच्या केलेल्या विविध विकास कामाच्या आधारावर संपूर्ण ताकतीनीशी भारतीय जनता पार्टी निवडणूक रिंगणात उतरली आहे.

या निवडणुकीत नगराध्यक्षपद महिलेकरिता आरक्षित असून या पदासाठी भाजपाच्या वतीने श्रीमती शोभा शामराव आकनगिरे यांनी भाजपाचे नेते आ. रमेशआप्पा कराड यांच्या उपस्थितीत १५ नोव्हेंबर शनिवार रोजी दुपारी रेणापूर तहसील कार्यालय येथे आपला उमेदवारी अर्ज दाखल केला. यावेळी भाजपा किसान मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष विक्रमकाका शिंदे, ओबीसी मोर्चाचे प्रदेश उपाध्यक्ष भागवत सोट, भाजपाचे जिल्हा उपाध्यक्ष नवनाथ भोसले, जिल्हा चिटणीस दशरथ सरवदे, माजी सभापती अनिल भिसे, उपसभापती अनंत चव्हाण, मंडल अध्यक्ष महेंद्र गोडभरले, शरद दरेकर, रेणापूरचे पहिले नगराध्यक्ष अभिषेक आकनगिरे, शहराध्यक्ष अच्युत कातळे, किसान मोर्चाचे साहेबराव मुळे, महादेव साळुंखे, अँड. मनोज कराड, सरपंच सुनील चेवले, रवींद्र नागरगोजे, नामदेव बोंबडे, विष्णू गोरे, पद्माकर चिंचोलकर, रवींद्र पाटील, रामराव मोरे, विजय चव्हाण, श्रीकृष्ण मोटेगावकर, दत्ता सरवदे, चंद्रकांत कातळे, श्रीकृष्ण जाधव, संजय वीरुळे, दिलीप आकनगिरे, नारायण राठोड, महेश गाडे, मारूफ आतार, गणेश चव्हाण, राजकुमार आलापुरे, श्रीकृष्ण पवार, शेख शफी, दिलीप चव्हाण, गणेश माळेगावकर, शिवाजी जाधव, मच्छिंद्र चक्रे, अंकुश मोटेगावकर, लक्ष्मण खलंगरे, अंतराम चव्हाण, धम्मानंद घोडके, उत्तम चव्हाण, श्रीमंत नागरगोजे, ज्ञानेश्वर शिंदे, हनुमंत भालेराव, लखन आवळे, डॉ. मोहाळे, रफिक शिकलकर, सोपान सातपुते, राजकुमार आकनगिरे, नरसिंग येलगटे, इस्माईल बावचकर, संतोष राठोड, योगेश राठोड, शरद चक्रे, रमा चव्हाण, मनोज चक्रे, फारूक कुरेशी, शेख अजीम, जगन्नाथ कातळे, अंकित हाके, सलीम शेख, अवेज कुरेशी, लक्ष्मण दळवी, सोमनाथ व्यवहारे, रोहन पांचाळ, आर्षद तांबोळी, सोनू उरगुंडे, हुसेन पठाण, महेश वरवटे यांच्यासह भारतीय जनता पार्टीचे लोकप्रतिनिधी पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## सहकार भवन मंजुर केल्याबद्दल सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा जिल्हा सहकारी पतसंस्था संघाच्या वतीने सत्कार



**लातूर/प्रतिनिधी :** लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या वार्षिक सर्वसाधारण सभेत पतसंस्था संघाचे अध्यक्ष व जिल्हा बँकेचे संचालक अशोक गोविंदपुरकर यांनी राज्याचे सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्याकडे लातूर शहरातील डालडाफॅक्टरी च्या रिकाम्या जागेत सहकार भवनांची इमारत बांधण्याची मागणी केली होती ती मागणी माननीय मंत्री महोदयांनी त्याच वार्षिक सभेत मान्यतेची घोषणा केली एवढेच नव्हे तात्काळ पुढील मंत्रिमंडळाच्या बैठकीत मराठवाड्यातील दुसऱ्या सहकार भवनासाठी ३२ कोटीचा निधीही मंजूर करून घेण्यात आला त्याबद्दल शनीवारी सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांचा शिरूर ताजबंद या ठिकाणी जाऊन जिल्हा पतसंस्था संघाचे वतीने सत्कार करण्यात आला व त्यांचे आभार व्यक्त करण्यात आले

**सहकार न्यायालयासाठी याच ठिकाणी जागा द्यावी**

यावेळी जिल्हा सहकारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री नामदार बाबासाहेब पाटील यांच्या कडे याच इमारतीमध्ये सहकार न्यायालयासाठी सुद्धा जागा उपलब्ध करून द्यावी अशी मागणी करण्यात आली जेणेकरून सर्व सहकाराची कार्यालय एका छताखालीच असतील त्याचा जनतेस फायदा होईल अशी मागणी केली या सत्कार प्रसंगी पतसंस्था संघाचे अध्यक्ष अशोक गोविंदपुरकर यांच्यासह उपाध्यक्ष मंचकराव पाटील सचिव एड, शिवराज सुगरे संचालक सर्वश्री बाबुराव सोमवंशी धोंडीबा वंगाटे ,शिवाजी कांबळे ,रमेश बिराजदार ,जाधव सर, इत्यादी संचालक उपस्थित होते याप्रसंगी उदगीर येथील सर्वपल्ली राधाकृष्णन कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सहकार मंत्री महोदयांचा यथोचित सत्कार करण्यात आला


## लातूर शहरातील वाहतुक नियोजनाचे अनुशंगाने मंगल कार्यालय मालकांची बैठक

**लातूर/प्रतिनिधी :** यावावत अधिक माहिती अशी की, लातूर शहरातील वाहनांच्या वाढलेल्या संख्येमळे पाकींगची समस्या उद्भवून वाहतूक कोंडी निर्माण होत आहे. तसेच शहरातील मंगलकार्यालयात लग्न समारंभ व इतर कार्यक्रमा करीता वेणाऱ्या वाहनांच्या पाकींगची सोय नसल्यामुळे वाहतुक कोंडी होत आहे. त्यामुळे उपविभागीय पोलीस अधिकारी कार्यालय, लातूर शहर येथे आज दि.१५/११/२०२५ रोजी १७.०० ते १८.०० वा.चे दरम्यान लातूर शहरातील मंगल कार्यालयाचे मालकांची बैठक घेण्यात आली. सदर बैठकीस शहरातील ५० ते ६० मंगलकार्यालयाचे मालक उपस्थित होते.

बैठकीमध्ये मंगलकार्यालयात कार्यक्रमासाठी येणाऱ्या लोकांच्या वाहनांची पाकींगची व्यवस्था करणेसाठी जवळील मोकळी जागा भाडेतत्वावर घेवून त्यामध्ये पार्कींग करणे व त्यावर संरक्षणासाठी वॉचमन नेमणेयायत पोलीसांनी मुचना केली असता त्यास मंगलकार्यालयाचे मालकांनी सहमती दर्शवली आहे. तसेच मंगलकार्यालयात कार्यक्रमाचे बळी डी. जे. डॉल्वी लावता येणार नाही, कार्यक्रमामधील स्पीकरचा आवाज सकाळी ०६.०० ते २२.०० पर्यंत शांतता क्षेत्राकरीता ५० डी.वी., निवासी क्षेत्राकरीता ५५ डी.वी., व्यापारी क्षेत्राकरीता ६५ डी.वी., औद्योगीक क्षेत्राकरीता ७५ डी.वी. पर्यंत मवदित ठेवावा, कार्यक्रमाची वेळी रात्री १०.०० वा. पावेतो असेल या अटीशर्ती मंगल कार्यालय मालकांनी कार्यक्रमाचे आयोजकांना लेखी कळविणेवावत सांगण्यात आले आहे.

सदरची बैठक श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनाखाली उपविभागातील पोस्टेचे प्रभारी अधिकारी व गोपनिय पोलीस अंमलदार यांनी आयोजीत केली होती.

## लातूर शहरातील वाहनांना शिस्त लावण्यासाठी ई-चलान मशिनव्दारे दंडात्मक कारवाईची विशेष मोहिम






**लातूर/प्रतिनिधी :** लातूर शहरातील वाहनांना शिस्त लावण्यासाठी ई-चलान मशिनव्दारे दंडात्मक कारवाईची विशेष मोहिम राबवली जात आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, लातूर शहरातील नियम बाहय वाहनावर बेशिस्त पार्क करणारे चार-चाकी, दुचाकी वाहनावर तसेच बेशिस्तपणे रिंग रोडचे सर्व्हिस रोडवर वाहन पार्कींग करणारे वाहनावर वाहतुक नियंत्रण शाखा, लातूर यांचेकडून ई-चलान मशिनव्दारे दंडात्मक कार्यवाहीची १५ दिवस विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

दि. १४/११/२०२५ रोजी अटोरिक्षा यांच्या मागील ई-चलान मशिनव्दारे दंडात्मक कारवाई केलेला पुर्वीचा दंड वसूल करण्याबाबत विशेष मोहीम राबवण्यात आली, तसेच विविध हेडखाली कारवाई करून एका दिवसात २२५ ई चलान केसेस करुन १,७८,८५०/- दंड आकारण्यात आला आहे.

दि.१४/११/२०२५ रोजी इंटर सेप्टर वाहनाव्दारे



ओव्हर स्पीड केसेस ६० केसेस एकुण दंड- १,२०,०००/- रूपये करण्यात आले.

ज्या अटोचे अनपेड ई-चलान भरणे थकीत असलेले केसेसचा दंड (सेंन्ड टू कोर्ट करून) मा. न्यायालयात त्यांचे विरूध्द खटले दाखल करण्यात येत आहेत.

मुख्य चौकामध्ये ५० ते ७५ मिटर अंतराचे आत थांबणारे अटोवर व कोठेही थांबून बेशिस्तपणे प्रवासी चढ-उतार करणारे वाहनावर भारतीय न्याय संहीता कलम २८५ प्रमाणे गुन्हे दाखल करण्यात येत आहेत. वरिष्ठ पोलीस अधिकारी यांचे मार्गदर्शनात लातूर पोलीस व वाहतुक नियंत्रण शाखेचे पोलीस अधिकारी व पोलीस अंमलदार यांचे कडून कडक कार्यवाही करण्याची मोहिम राबवित आहोत. लातूर जिल्हा पोलीस दलातर्फे जनतेस अवाहन करण्यात येते की, लातूर शहरातील ॲटो रिक्षा, खाजगी दुचाकी व चार चाकी वाहनधारकांनी व जनतेनी वाहतुकीचे नियमपाळावे व वाहनाची कागदपत्रे सोबत ठेवावे असे आवाहन करण्यात येते आहे. ही मोहीम आणखी तीव्र होणार असुन त्यानंतरही कायम चालु राहणार आहे.

सदरची कामगिरी ही श्री. समीरसिंह साळवे, उपविभागीय पोलीस अधिकारी, लातूर शहर यांचे मार्गदर्शनात श्री. विठ्ठल दराडे, पोलीस निरीक्षक, वाहतुक नियंत्रण शाखा व त्यांचे अधिनस्थ अधिकारी व अंमलदार हे करीत आहेत.

## कॉक्सिटमध्ये शुक्रवारी 'बायो-मॅन्यूफॅक्चरिंग ऑफ व्हॅल्यू डेड प्रॉडक्ट्स' विषयावर राष्ट्रीय परिसंवाद

**लातूर/प्रतिनिधी :** येथील रॉयल एज्युकेशन सोसायटीच्या कॉक्सिट महाविद्यालयातील जैवतंत्रज्ञान विभागातर्फे शुक्रवारी (दि. २१) राष्ट्रीय पातळीवरील एक दिवसीय सेमिनाराचे आयोजन करण्यात आले आहे.

या सेमिनारमध्ये मूल्यवर्धित जैव उत्पादनांची निर्मिती, कमी किमतीच्या रॉ-मटेरियलपासून बायो-हेल्थ प्रॉडक्ट्सची निर्मिती, उद्योग संशोधनातील नवनवीन प्रवाह तसेच आंतरराष्ट्रीय संशोधन व उच्च शिक्षणातील संधी यांसारख्या विषयांवर चर्चा होणार आहे.या सेमिनारासाठी देश-विदेशांतील तज्ज्ञ उपस्थित राहणार आहेत. त्यात थायलंडच्या हत्याई येथील प्रिन्स ऑफ साँगकोला विद्यापीठाचे प्रोफेसर डॉ. बेंजाकूल व शैक्षणिक संशोधक डॉ. उमेश पाटील, राष्ट्रीय कृषी-अन्न व जैव उत्पादन संस्था (नाभी) मोहाली येथील डॉ. शिवराज निळे, पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे डॉ. महेश पाटील मार्गदर्शन करणार आहेत.

सेमिनाराचे उद्दिष्ट बायोमॅन्युफॅक्चरिंग तंत्रज्ञानाची सखोल समज, मूल्यवर्धित उत्पादनांच्या उद्योगक्षमतेची ओळख, आंतरराष्ट्रीय संशोधन मार्गदर्शन आणि उद्योगशिक्षण दुवा मजबूत करणे आहे. शुक्रवारी (दि. २१) सकाळी ९ वाजता उद्घाटन होणार आहे. मर्यादित जागांमुळे पूर्वनोंदणी आवश्यक आहे. विद्यार्थी व संशोधकांनी सहभागी होऊन या परिसंवादाचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थाध्यक्ष डॉ. एम. आर. पाटील, प्राचार्य डॉ. विनायक जाधव यांनी यांनी केले आहे.

## लोकशाही मजबूत करण्यासाठी विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक महत्त्वाची : तहसीलदार तांदळे

**लातूर/प्रतिनिधी : भारत हा लोकशाही प्रधान देश आहे आणि लोकशाही अधिक सक्षम करण्यासाठी शालेय स्तरावर विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक अत्यंत महत्त्वाची ठरते. या प्रक्रियेमुळे विद्यार्थ्यांना निवडणूक व्यवस्थेची जवळून ओळख होते व त्यांच्यात नेतृत्वगुण, जबाबदारीची जाणीव आणि नागरिकत्वाचे भान विकसित होते,'' असे मत लातूरचे तहसीलदार सौदागर तांदळे यांनी व्यक्त केले.**

साने गुरुजी माध्यमिक विद्यालयात आयोजित करण्यात आलेल्या शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ च्या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणूक उपक्रमाच्या समारोप समारंभ प्रसंगी ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. पुढे म्हणाले की, ''साने गुरुजी विद्यालयाने राबवलेला हा आदर्शवत उपक्रम विद्यार्थ्यांना मतदानाचे स्वरूप, महत्त्व आणि निवड प्रक्रिया जवळून अनुभवण्याची संधी देतो. या उपक्रमांमुळे भविष्यातील जागरूक नागरिक घडतात.''

याप्रसंगी माध्यमिक विभागाच्या (नियोजन) शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे, सानेगुरुजी शैक्षणिक संकुलाचे मुख्य कार्यकारी अधिकारी मनोज माने, संस्थेचे प्रशासकीय अधिकारी गोविंद माने, नागोराव कांबळे, उषा राठोड, शाळेचे मुख्यालय इस्माईल शेख, रवी कुलकर्णी आदि उपस्थित होते.

या प्रसंगी उपस्थित शिक्षणाधिकारी तृप्ती अंधारे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधताना म्हणाल्या, विद्यालयाने राबवलेल्या

'' चुनावी पाठशाळा'' अर्थात ''विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुक'' या उपक्रमात मतदान करणारे सर्व विद्यार्थी हे केवळ शाळेचे विद्यार्थी न राहता, आता



आमचे प्रतिनिधी आणि मित्रदेखील झाले आहेत. त्यांची जबाबदारी आता वाढली असून, त्यांनी आपल्या कुटुंबातील सदस्य,नातेवाईक तथा परिसरातील मतदारांना मतदानाचे महत्त्व सांगून मतदानासाठी प्रेरित करून मतदानाचा टक्का वाढवावा जेणेकरून लोकशाही जिवंत राहील.

या विद्यार्थी प्रतिनिधी निवडणुकीमध्ये ९१५ विद्यार्थी मतदाराने आपल्या मतदानाचा हक्क बजावला. ज्यामध्ये १२५ मते घेत चि. ढवळे धैर्यशील बाळासाहेब या विद्यार्थ्याने शाळेचा विद्यार्थी प्रतिनिधी () म्हणून बाजी मारली तर कुमारी राठोड पुनम अविनाश या विद्यार्थिनीने ११५ व चि. धपाटे विनायक अशोक यांनी १०६ मते घेत अनुक्रमे द्वितीय व तृतीय क्रमांक मिळवला.

या निवडणूक प्रक्रियेते शाळेचे मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी निवडणूक निर्णय अधिकारी व विभाग प्रमुख गंगाधर डिगोळ यांनी सहाय्यक निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून काम पाहिले.

या कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक इस्माईल शेख यांनी केले तर आभार गंगाधर डिगोळे यांनी मानले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचलन गणेश परळे यांनी केले.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी सहशिक्षक स्मिता कावळे , शशिकांत पवार, कमल काळगापुरे, मीनाक्षी यादव , सचिन माने, हरिदास कोयले, शिवगंगा जगताप, कोमल डोणगावे, सतीश गायकवाड,अमोल पवार, नवनाथ वडवळे, वैभव धोत्रे , सुनंदा पाटील, दयानंद लहाडे, पौर्णिमा बनसोडे, भरत सूर्यवंशी, सत्यपाल जाधव, लिपिक बालाजी सावंत व सेवक शिवराम चव्हाण यांनी परिश्रम घेतले.

## दयानंद विज्ञानमध्ये भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जनजाती गौरव दिन उत्साहात साजरा

**लातूर/प्रतिनिधी :** भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचे शतकोत्तर सुवर्णमहोत्सवी वर्ष (१५० वर्ष) म्हणून साजरे करण्यात येत आहे.दि.१५ नोव्हेंबर २०२५ रोजी दयानंद विज्ञान महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना विभाग व कार्यालय यांच्या संयुक्त विद्यमाने भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीनिमित्त जनजाती गौरव दिन म्हणून साजरा करण्यात आला.यावेळी महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ.सिद्धेश्वर बेल्लाळे यांनी आदिवासींच्या हक्कासाठी लढणारे जननायक आणि भारतीय स्वातंत्र्यलढ्यातील क्रांतिकारक,स्वांतत्र्य सैनिक,क्रांतिसूर्य बिरसा मुंडा यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले आणि सर्वांना जयंतीच्या शुभेच्छाही दिल्या. याप्रसंगी पर्यवेक्षक डॉ.हेमंत वरूडकर, पर्यवेक्षिका डॉ.संध्या कोल्हे, कार्यालयीन अधीक्षक नवनाथ



भालेराव, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.अमोल ठोसर, डॉ.सुरज कोल्हे, धीरज पारिख, शशिकांत गर्जे, महालिंग माळगे, रजनीकांत मदने,सुदर्शन काळे,बाबासाहेब बचाटे,पोपट बाजपाई यांच्यासह इतर प्राध्यापक आणि शिक्षकेत्तर कर्मचारी उपस्थित होते.

प्रो. जडे यांचे रबरी शिक्के
कॉम्प्युटर नॉयलॉन रबर असलेले
टिकाऊ रबरी शिक्के
तयार करून मिळतील.




शाखा १.
जडे-भारत प्रिंटींग प्रेस, मेनरोड, लातूर
शाखा २.
जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्र नगर, लातूर
संपर्क: (०२३८२) २४२६०८,२४५४०९

# मोकाट कुत्रे नियंत्रणात अपयश, नागरिकांतून खबरदारीची मोहीम

उमरगा(प्रतिनिधी)-उमरगा तालुक्यात शहरासह ग्रामीण भागात मोकाट कुत्र्यांचा धोका दिवसेंदिवस वाढत चालला आहे. नागरिक, विशेषतः लहान मुले आणि वयोवृद्ध व्यक्तींवर हल्ल्यांच्या घटनांमध्ये लक्षणीय वाढ झाली आहे. नगरपालिकेने मोकाट कुत्र्यांना पकडणे, त्यांचे निर्बीजीकरण करणे आणि लसीकरणाची मोहीम राबवणे या बाबतीत अपयश दाखविल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. काही ठिकाणी नागरिकांनीच कुत्र्यांना मारून टाकण्यास सुरुवात केल्याने दहशतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

चार दिवसांपूर्वीच शहरातील जुनी पेठ, पतंगेरोड, हमीद गल्ली या भागांमध्ये मोकाट कुत्र्यांनी तब्बल १५ नागरिकांना चावा घेतल्याची घटना घडली आहे. या वाढत्या घटनांमुळे नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले असून, प्रशासनाच्या निष्क्रियतेवर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. उपजिल्हा रुग्णालयात सध्या रेबीज लस उपलब्ध असली तरी नागरिकांना सतर्क राहण्याचा सल्ला वैद्यकीय अधिकाऱ्यांकडून दिला जात आहे.

शहरात कुत्र्यांची अधिकृत गणना झालेली नसली तरी अंदाजे दहा हजाराहून अधिक मोकाट कुत्रे शहरात वावरत असल्याचे सांगितले जाते. ग्रामीण भागात हे प्रमाण आणखी मोठे आहे. दर महिन्याला सुमारे ३९१ रुग्णांना रेबीज विरोधी लस देण्यात येत असल्याची माहिती उपजिल्हा रुग्णालयाने दिली आहे. गेल्या नऊ महिन्यांत कुत्र्याच्या चाव्यामुळे रेबीज घातक रोग, काळजी घेणे गरजेचे रेबीज कुत्र्यापासून माणसाला होणारा अत्यंत प्राणघातक असा रोग असून एकदा रोग झाला तर मृत्यूचा धोका असल्यामुळे हा रोग होवू नये म्हणून योग्य काळजी घेणे गरजेचे आहे.

या आजाराची लक्षणे ९० ते १४७ दिवसांत दिसतात. घाण कचऱ्यासह मटण, चिकन, चायनीज दुकाने, हॉटेलच्या परिसरात या कुत्र्यांच्या झुंडी कायम आहेत.शहरात हॉटेलचा कचरा अनेकदा रस्ते व गटारीच्या कडेला टाकतात. यामुळे या परिसरात कुत्र्यांचा वावर वाढला आहे. गेल्या ९ महिन्यांत कुत्र्याने चावा घेतलेल्या रुग्णांची संख्या २७४२ इतकी आहे. मात्र यावर उपचार करण्यासाठी आवश्यक तेवढी औषधांचा साठा उपलब्ध होत आहे. तीन वर्षात १२,८९० नागरिकांना चावा : कुत्रा चावल्यावर जखम स्वच्छ साबणाने धुवून काढावी, जखमेवर जंतूनाशक लावावे, शक्यतो चावा घेतलेल्या जखमेवर चुना, हळद, माती, तंबाखू, चहा पावडर, लिंबू असे पदार्थ लावू नये, पट्टी बांधू नये,जखमेला टाके घालू नये. रक्तस्त्राव जास्त होत असल्यास डॉक्टरांचे सल्ल्यानुसारच उपचार करावेत.

गेल्या तीन वर्षांत उमरगा उपजिल्हा रुग्णालयात नोंदविल्यानुसार तब्बल १२,८९० नागरिकांना कुत्र्याने चावा घेतला आहे. त्यापैकी २०२३-२४ मध्ये ५,५७०, २०२४-२५ मध्ये ४,५७८ आणि २०२५ च्या जानेवारी ते सप्टेंबर या काळात २,७४२ रुग्णांनी उपचार घेतले आहेत. उपचार घेतलेल्या रुग्णांची संख्या तब्बल २,७४२ इतकी आहे. प्रशासनाने तातडीने मोकाट कुत्र्यांची गणना, निर्बीजीकरण मोहीम आणि जनजागृती उपक्रम राबवणे आवश्यक आहे. तोपर्यंत नागरिकांनी स्वतः ची व आपल्या मुलांची सुरक्षितता लक्षात घेऊन सतर्क राहणे, तसेच रेबीज प्रतिबंधक लसीकरण करणे गरजेचे आहे.

डिग्गीरोड परिसरात मोकाट कुत्र्यांमुळे नागरिक हैराण

शहरात डिग्गीरोड परिसरात मोकाट कुत्र्यांनी नागरिकांना अक्षरशः हैराण केले आहे. मागील चार दिवसापूर्वी रस्त्याच्याकडेने येत असताना कुत्र्याने पाठीमागून हल्ला करीत पायाला चावा घेतला. डॉक्टरांच्या सल्ल्यानुसार लस घेणे आवश्यक आहे.

# धाराशिवला २४ तास मुबलक पाणीपुरवठा करणार आमदार राणाजगजितसिंह पाटील यांची जाहीर ग्वाही



धाराशिव (रामेश्वर डोंगरे)- तब्बल शंभर किलोमीटरपेक्षा अधिक अंतरावरून आपण धाराशिव शहरासाठी पाणी आणले. अशक्यप्राय वाटणारी योजना आपण पूर्ण केली. मात्र उबाठा गटाला त्याचे साधे नियोजनही करता आले नाही. येत्या काळात धाराशिव शहराला २४ तास मुबलक पाणीपुरवठा केला जाणार आहे. त्यासाठी नियोजन सुरू आहे. हे केवळ स्वप्न नाही तर उजनी पाणीपुरवठा योजना ज्यापद्धतीने आपण यशस्वी करून दाखवली अगदी त्याप्रमाणेच ही कामसुद्धा आपण करणारच अशी जाहीर ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

बिहार विधानसभा निवडणुकीत एनडीएच्या ऐतिहासिक विजयाबद्दल भारतीय जनता पक्षाच्या पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी शुक्रवारी दुपारी धाराशिव येथील छत्रपती शिवाजी महाराज चौकात विजयी जल्लोष साजरा केला. महापुरुषांना अभिवादन करून एकमेकांना मिठाई वाटून, फटाक्यांच्या आतषबाजीत आणि घोषणांच्या निनादात सर्वांनी हा आनंद साजरा केला. यावेळी कार्यकर्त्यांना आणि पदाधिकारी बांधवांना आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी मार्गदर्शन केले.

बिहारच्या जनतेने विकासाच्या मुद्द्यावर पंतप्रधान . नरेंद्रजी मोदी यांच्या नेतृत्वावर पुन्हा एकदा विश्वास ठेवत एनडीएला अपेक्षेपेक्षा मोठे, अभूतपूर्व आणि ऐतिहासिक बहुमत दिले आहे. या विजयाने राष्ट्रीय पातळीवरील विकासमार्ग अधिक भक्कम झाला आहे. बिहार राज्यातील सर्वसामान्य सामान्य नागरिकांचा भारतीय जनता पक्षावर असलेला दृढ विश्वास या निकालातून ठळकपणे अधोरेखित झाला आहे. धाराशिवची जनतादेखील महायुती व भाजपच्या पाठीशी खंबीरपणे उभी आहे. येत्या पालिका निवडणुकीत त्याचा प्रत्यय येणार आहेच. यापूर्वी धाराशिव शहरात आपण अनेक महत्वाचे प्रकल्प आणि योजना पूर्णत्वास नेल्या आहेत. आपल्याकडून सर्वसामान्य नागरिकांच्या मोठ्या अपेक्षा आहेत. त्यासाठी अनेकजण त्यांच्या समस्या, अडीअडचणी आपल्याकडे घेऊन येतात. त्या सगळ्यांची पूर्तता करण्याची जबाबदारी आपली आहे. मात्र आपण सर्व पदाधिकारी बांधवांनी त्यासाठी सातत्याने पाठपुरावा करायला हवा. शहरवासीयांच्या अडचणी दूर करणे आपले कर्तव्य आहे. मध्यंतरी पालिकेत सत्तेत असलेल्या ठाकरे गटाने शहराचे अक्षरशः वाटोळे केले आहे. त्या सगळ्या अडचणींवर मात करून आपण सर्वांनी कामाला लागावे असे आवाहनही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी केले.

बिहार विधानसभा निवडणुकीत अतोनात मेहनत घेणाऱ्या भारतीय जनता पक्ष व एनडीएच्या सर्व कार्यकर्त्यांचे, पदाधिकाऱ्यांचे व नेतेमंडळींचे आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी यावेळी मनः पूर्वक अभिनंदन केले. तसेच विकासाभिमुख सरकारला इतके भक्कम व ऐतिहासिक असे बहुमत देणाऱ्या बिहारच्या जनतेचे हार्दिक आभारही मानले. उपस्थितांनी एकमेकांना पेढे आणि लाडू भरवून हा आनंद साजरा केला. यावेळी श्री.दत्ताभाऊ कुलकर्णी, श्री.सुरेशभाऊ देशमुख, श्री.नितीन काळे,श्री. नेताजी पाटील, श्री.अनिल काळे, श्री.अमित शिंदे, श्री.नितीन भोसले, श्री.सुनील काकडे, श्री.अभय इंगळे, श्री.युवराज नळे, श्री.नितीन शेरखाने, श्री.संपतराव डोके, श्री.पांडुरंग लाटे, प्रीतीताई कदम, अंजली बेताळे, विद्या माने, श्री.अभिजित काकडे, श्री.रमण जाधव, श्री.मनोज रणखांब, श्री.विलास सांजेकर, श्री.मेसा जानराव यांच्यासह प्रमुख कार्यकर्ते व नागरिक उपस्थित होते.

# जि.प.प्रशाला जळकोट येथे बालकांच्या हस्ते बालदिन उत्साहात साजरा



जळकोट (विजय पिसे)- तुळजापूर तालुक्यातील जिल्हा परिषद प्रशाला जळकोट येथे भारताचे पहिले पंतप्रधान पंडित जवाहरलाल नेहरू यांची जयंती बालदिन म्हणून उत्साहाने साजरा करण्यात आली. बाल दिनाचे औचित्य साधून शाळेमध्ये कार्यक्रमाचे अध्यक्ष, प्रमुख पाहुणे, सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन हे सर्व विद्यार्थ्यांनीच केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी आरती बिराजदार तर प्रमुख पाहुणे जवाहरलाल नेहरू यांची वेशभूषा केलेला आरुष बिराजदार, जैद बागवान, वैभवी पिसे, परमेश्वर कुंभार हे विद्यार्थी उपस्थित होते. सर्वप्रथम अध्यक्ष व प्रमुख पाहुण्यांचे उपस्थित विद्यार्थ्यांनी गुलाब पुष्पाची उधळण करीत व्यासपीठावर विराजमान केले. त्यानंतर पंडित जवाहरलाल नेहरू यांच्या प्रतिमेचे पूजन अध्यक्ष , प्रमुख पाहुणे असणाऱ्या बालचिमूने केले. त्यानंतर शाळेतील इयत्ता पाचवी ते दहावीपर्यंतच्या पुढील विद्यार्थ्यांनी भाषण केली. विपुल पिसे,आरव यादव, योगेश कदम, शरद कुंभार, विश्वनाथ माळगे, धीरज पाटील, सोहम लष्करे, आरुष बिराजदार, सुरज साळुंखे,वैभवी पिसे,समृद्धी कदम, स्वाती काडते , लक्ष्मी कुंभार, सोहम कुंभार, सागर सरवदे, जैद बागवान, श्रुती कांबळे, अध्यक्षीय भाषणांनी आरती बिराजदार हिने समारोप केला. कार्यक्रमानंतर पाचवी ते दहावी मधील सर्व विद्यार्थ्यांना शालेय पोषण आहारा गोड पदार्थ युक्त देण्यात आला. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन ऋतुजा कदम व आदिती यादव तर सर्वांचे आभार मोहिनी कुंभार हिने मानले. कार्यक्रम यशस्वीतेसाठी शाळेचे मुख्याध्यापक संतोष सारणे, सांस्कृतिक विभाग प्रमुख रवींद्र डावरे सर, पुष्पलता कांबळे, जयराम शिंदे, संगीता आडे , बसवराज पुरंत, समाधान पवार, वैष्णवी कदम, यांनी सहकार्य केले.

लातूर समाचार धाराशिव
बातम्या,लेख व जाहिराती साठी संपर्क
9422472502
9175325708

# पोदार प्रेप, धाराशिवमध्ये बालदिन उत्साहात साजरा



धाराशिव (प्रतिनिधी)-पोदार प्रेप, धाराशिव येथे १४ नोव्हेंबर रोजी* बालदिनाचा आनंददायी कार्यक्रम उत्साहात साजरा करण्यात आला. लहान मुलांच्या हास्य फुलवणारा हा दिवस विविध खेळ, नृत्य आणि उपक्रमांनी सजला होता.

कार्यक्रमाची सुरुवात विद्यार्थ्यांचे *हॅपी चिल्ड्रन्स डे बॅजेसने स्वागत* करून झाली. शाळेतील शिक्षकांनी विद्यार्थ्यांसाठी विशेष कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

मुलांसाठी बबल ब्लोअर खेळ , पॉम-पॉम डान्स आणि विविध मजेशीर *सर्जनशील क्रिया (रलींळींळींळशी)* घेण्यात आल्या. प्रत्येक उपक्रमात मुलांनी भरभरून सहभाग घेतला व आनंद लुटला.

कार्यक्रमाच्या शेवटी शाळेतर्फे प्रत्येक विद्यार्थ्याला *छानसा गिफ्ट* देण्यात आला, ज्यामुळे मुलांचे बालदिनाचे क्षण अधिक संस्मरणीय ठरले.

संपूर्ण दिवसभर शाळा मुलांच्या आनंदाने आणि हसऱ्या चेहऱ्यांनी गजबजलेली होती. बालदिनाच्या निमित्ताने शाळेने विद्यार्थ्यांना प्रेम, आनंद आणि सर्जनशीलतेचा खजिना दिला.

# शिवराज्याभिषेक सोहळा समिती धाराशिवच्या अध्यक्षपदी अमोल सिरसट तर शहराध्यक्षपदी संतोष घोरपडे यांची निवड




धाराशिव (प्रतिनिधी)- धाराशिव येथील सामाजिक संघटना शिवराज्याभिषेक सोहळा समितीच्या सन २०२५-२६ या वर्षाकरिता धाराशिव जिल्हा व धाराशिव शहर कार्यकारिणींची निवड करण्यात आली.यामध्ये सर्वानुमते अध्यक्षपदी श्री अमोल सिरसट तर शहराध्यक्षपदी श्री संतोष घोरपडे यांची एकमताने निवड करण्यात आली.काल झालेल्या समितीच्या सर्वसाधारण वार्षिक बैठकीमध्ये सर्वानुमते या निवडीत जिल्हा उपाध्यक्षपदी श्री हनुमंत यादव, सचिव श्री आकाश भोसले, कार्याध्यक्ष मनोज मोरे, सहकार्याध्यक्ष अमोल साळुंके, संघटक सतीश थोरात, सहसंघटक सचिन उमाप, कोषाध्यक्ष सचिन पाटील, सहकोषाध्यक्ष राजेंद्र मोरे, प्रवक्ता राहुल घोडके, सहप्रवक्ता अविनाश अंधारे, प्रसिद्धी प्रमुख लहू शिंदे, सहप्रसिद्धी प्रमुख विशाल घोडके, सोशल मीडिया महेश कळमकर, विनोद कावळे तर कायदेशीर सल्लागार पदी अड. श्री जयप्रकाश साळुंके यांची निवड करण्यात आली.तर धाराशिव शहर कार्यकारिणी मध्ये शहराध्यक्षपदी श्री संतोष घोरपडे, उपाध्यक्ष श्री भैरवनाथ रणखांब, सचिव श्री ऋषिकेश काळे,कार्याध्यक्ष अविनाश रणखांब,सहकार्याध्यक्ष उदय गायकवाड, संघटक प्रथमेश जगदाळे, सह संघटक आदित्य मुंडे, कोषाध्यक्ष अनंत झाडके, सहकोषाध्यक्ष लखन क्षीरसागर, प्रवक्ता श्री रामानंद माडेकर, सहप्रवक्ता केदार जाधव, प्रसिद्धीप्रमुख योगेश रायबान, सहप्रसिद्धीप्रमुख अनिल अंकुश, सोशल मीडिया सुजित मगर, प्रदीप लोमटे तर कायदेशीर सल्लागार पदी अड. श्री महेश गायकवाड यांची एकमताने निवड करण्यात आली.यावेळी समितीचे सर्व आजी-माजी पदाधिकारी व बहुसंख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

यावेळी समितीच्या कार्यकर्त्यांनी जल्लोषात आनंद साजरा केला.

# तरसाचा सहा शेळ्या, रेडकावर हल्ला वाशीजवळ गोठ्यात आढळली मृत जनावरे

वाशी (प्रतिनिधी)-शहरालगत असलेल्या गोठ्यात मंगळवारी सायंकाळी सात वाजण्याच्या सुमारास तरसाने हल्ला केला. त्यात सहा शेळ्या व एका रेडकाचा फडशा पाडला.

रामदास बापू पवार हे शहरालगत बाजार समिती परिसरातील शेतात राहतात. मंगळवारी पाहुण्यांचा कार्यक्रम असल्याने संपूर्ण कुटुंब बाहेरगावी गेले होते. रात्री उशिरा परतल्यानंतर गोठ्यात बांधलेल्या सहा शेळ्या, म्हशीचे रेडकू हिंस्र पशूने मारल्याचे निदर्शनास आले. सदरील घटनेची माहिती वनविभागाला रात्री उशिरा मिळाल्याने बुधवारी सकाळी वनपाल चांगदेव करगळ, वनरक्षक सागर जगताप, महादेव अंकुशे, सुहास भैरट यांनी घटनास्थळी भेट दिली. या वेळी लगत असलेल्या ऊस, तूर या पिकात हिंस्र पशूच्या ठशांचा माग काढण्यात आला. मिळालेले ठसे हे तरसाचे असल्याचे त्यांनी सांगितले. या वेळी पशुवैद्यकीय अधिकारी प्रदीप दळवे यांनी ठार झालेल्या शेळ्या, रेडकाचे शवविच्छेदन करून वनविभागाकडून पंचनामा करून बाधित शेतकऱ्याचा नुकसानभरपाई प्रस्ताव वरिष्ठ स्तरावर पाठवण्यात येणार असल्याचे या वेळी सांगितले.

## मद्यपी चालकावर गुन्हा दाखल

शिराढोण(प्रतिनिधी)- पोलीस ठाण अंतर्गत सखाराम रा. जायफळ ता. कळंब जि. धाराशिव, हे दि.१४.११.२०२५ रोजी आपल्या ताब्यातील स्कुटी क्र एमएच १४ ही जायफळ चौक येथे हायगयी व निष्काळजीपणे रोडवर मद्यधुंद अवस्थेत चालवून कलम-१८५ मोवाका चे उल्लंघन केले. यावरुन पोलीसांनी सरकारतर्फे दिलेल्या प्रथम खबरेवरुन नमूद व्यक्तीविरुध्द शिराढोण पो ठाणे येथे गुन्हा नोंदवला आहे.

## धाराशिव शहरातील कांही महत्वाचे फोन नंबर

१) रुग्णवाहिका २२३९७६
२) रक्तपेढी २२३९७६
३) जिल्हा रुग्णालय २२६९२७
४) शहरपोलिस स्टेशन२४०९९९
५) अग्नीशामक विभाग २२२१०१
६) रेल्वेस्टेशन २४०९९९
७) एसपी कार्यालय २२७६२०
८) जिल्हाधिकारी का.२२४५०१
९) तहसिल का. २२७८८२
१०) जि.प. २२५४०७
११)नगरपरिषद २२५४०७
१२)जिल्हा माहिती अधिकारी ०२४७२-२२२७४४
१३) जिल्हा उद्योग केंद्र (डीआयसी) ०२४७२-२२२२२६
१४) उस्मानाबाद जिल्ह्याचे उपसंचालक ०२४७२-२२७८ ९ २
१५) उप विभागीय वन कार्यालय, उस्मानाबाद ०२४७२-२२३४०८
१६)अधीक्षक उत्पादन शुल्क कार्यालय ०२४७२-२२३३८७
१७) जिल्हा कल्याण अधिकारी ०२४७२-२२२०१४
१८) प्रादेशिक परिवहन अधिकारी (आरटीओ) ०२४७२-२२२५५५
१९) मुख्य पोस्ट ऑफिस ०२४७२-२२२२१४
२०) जिल्हा रोजगार अधिकारी ०२४७२-२२२२३६
२१) विभागीय नियंत्रक (एमएसआरटीसीसी) ०२४७२-२२२२१६
२२) लातूर समाचार ९४२२४७२५०२
बीडीओ, एम.आर.ए.जी.एस. जिल्हा परिषद ०२४७२-२२०६११
२३)मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२२६८४० २४)
२४) अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी ०२४७२-२५)
२२३३९७ प्रकल्प संचालक ०२४७१-२२१५५२
२५) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (सामान्य प्रशासन) ०२४७२-२२३३८८
२६) उपमुख्य कार्यकारी अधिकारी (ग्राम पंचायत) ०२४७२-२२३३४३
२७) उप मुख्य कार्यकारी अधिकारी (स्त्री व मुल) ०२४७२-२२२५७०
२८) मुख्य खाते व वित्त अधिकारी ०२४७२-२२२१३२
२९) शिक्षण अधिकारी (प्राथमिक) ०२४७२-२२४१८४

हे पत्र मुद्रक,प्रकाशक, संपादक व मालक दयानंद शंकरराव जडे, यांनी जडे ऑफसेट प्रिंटर्स, मित्रनगर, लातूर (महाराष्ट्र) येथे छापून समर्थनगर उस्मानाबाद येथे प्रकाशित केले. मो.नं.९४२२४७२५०२
Latur Samachar Printed & Published by Jade Dayanand Shankar , Printed at Jade Offset Printers,Mitra Nagar Latur. and Published at Samarthnagar,Dharashiv (Osmanabad) Editor : Jade Dayanand Shankar Mob:9422472502 RNI- MAHMAR/2003/11649